# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १३१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.१९ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## पुण्यात धावत्या कारमध्ये महिलेवर बलात्कार; आरोपीचा शोध सुरु

पुणे दि.१८ (प्रतिनिधी)- लिफ्ट देण्याच्या बहाण्याने एका महिलेवर धावत्या कारमध्ये बलात्कार झाल्याची संतापजनक घटना पुण्याच्या कोरेगाव पार्क परिसरात घडली आहे. नसरापूर बलात्कार व हत्या प्रकरणातील वेदना कायम असताना ही घटना घडल्यामुळे पुण्यात संतापाची लाट उसळली आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास ही घटना घडली. पीडित महिला व आरोपी पुरुषाची रात्री कोरेगाव पार्क परिसरातील एका प्रसिद्ध हॉटेलमधील पार्टीत ओळख झाली होती. त्यानंतर आरोपीने पीडितेला घरी सोडतो म्हणून कारमध्ये बसवले. त्यानंतर धावत्या कारमध्येच तिच्यावर बलात्कार केला. प्राथमिक तपासात महिलेवर बलात्कार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी कोरेगाव पार्क पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोरेगाव पार्कसारख्या शहरातील वर्दळीच्या भागात ही घटना घडल्यामुळे मोठा संताप व्यक्त केला जात आहे.

पोलिसांनी या घटनेतील गांभिर्य ओळखून तपास सुरू केला आहे. विशेषतः या प्रकरणी पोलिस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारावर आरोपीचा शोध सुरू केला आहे.

# 'नीट' पेपरफुटी प्रकरणात प्रा.शिवराज मोटेगावकर अटकेत

## विशेष सीबीआय न्यायालयाकडून ९ दिवसाची कोठडी

पुणे दि.१८ (प्रतिनिधी)- देशभरात गाजत असलेल्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणात लातूरमधील 'आरसीसी क्लासेस' या शिकवणी वर्गाचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर याला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) सोमवारी अटक करण्यात आली. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या प्रा. मोटेगावकर याला नऊ दिवस 'सीबीआय' कोठडीत ठेवण्याचे आदेश विशेष न्यायालयाने दिले.

'पेपरफुटी प्रकरणात प्रा. मोटेगावकर याची रविवारी दिवसभर चौकशी करण्यात आली. पेपरफुटी प्रकरणात यापूर्वी अटक करण्यात आलेला मुख्य सूत्रधार आरोपी पी. व्ही. कुलकर्णी हा परीक्षाप्रक्रियेशी संबंधित होता. प्रा. मोटेगावकर याचे लातूरमधील कार्यालय, तसेच निवासस्थानी सीबीआयच्या पथकाने छापे टाकले. तेव्हा रसायनशास्त्र विषयाशी संबंधित प्रश्नसंच सापडले. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न ३ मे रोजी पार पडलेल्या 'नीट'च्या प्रश्नपत्रिकेत होते. पेपरफुटी प्रकरणात प्रा. मोटेगावकर सामील असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर अटक करण्यात आली', अशी माहिती 'सीबीआय'कडून देण्यात आली.

प्रा. मोटेगावकर याची रविवारी पुण्यातील 'सीबीआय' कार्यालयात चौकशी करण्यात आली. 'नीट' पेपरफुटी प्रकरणाच्या अनुषंगाने 'सीबीआय'च्या पथकाने लातूरमध्ये 'आरसीसी क्लासेस'चे कार्यालय आणि मोटेगावकर यांच्या निवासस्थानी छापे टाकले. तेथे शोधमोहीम राबविली. प्रा. मोटेगावकर याचे कार्यालय, निवासस्थानातून कागदपत्रे, लॅपटॉप, मोबाइल संच जप्त




करण्यात आले, असे 'सीबीआय'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

प्रा. मोटेगावकर याला अटक करण्यात आल्यानंतर पुण्यातील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. प्रा. मोटेगावकर याचे कार्यालय आणि निवासस्थानातून कागदपत्रे, लॅपटॉप, मोबाइल संच जप्त करण्यात आले आहे आहेत. इलेक्ट्रॉनिक उपकरणाची तांत्रिक तपासणी करायची आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करायचा आहे.

तपासासाठी मोटेगावकर याला 'सीबीआय' कोठडी देण्यात यावी, अशी विनंती 'सीबीआय'च्या अधिकाऱ्यांनी न्यायालयात केली. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या मोटेगावकर याची प्रवासी कोठडी (ट्रान्झिट रिमांड) मिळवण्यात आली असून, पुढील तपासासाठी मोटेगावकर याला तपासासाठी दिल्लीतील सीबीआय कार्यालयात नेण्यात येणार आहे.

जीवशास्त्राच्या अध्यापक मनीषा गुरुनाथ मांढरे हिला दिल्लीतील केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) अटक करण्यात आली. दिल्लीतील विशेष न्यायालयाने १४ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. मनीषा मांढरे परीक्षा प्रक्रियेशी संबंधित आहे. या प्रकरणात तिची दिल्लीत चौकशी करण्यात आली. परीक्षा प्रक्रियेशी संबंधित असल्याने तिचा वनस्पतिशास्त्र, तसेच प्राणिशास्त्र या विषयांच्या प्रश्नपत्रिकांशी संबंध होता. या प्रकरणात बिबवेवाडीतील ब्यूटीपार्लरचालक महिला मनीषा वाघमारे हिला अटक करण्यात आली आहे. वाघमारेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मांढरेला घरी बोलावले होते. तेथे मांढरेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रश्न, अचूक उत्तरांची माहिती दिली. ही बाब तपासात उघडकीस आल्यानंतर मांढरेला अटक करण्यात आली. या प्रकणात मुख्य सूत्रधार लातूरमधील प्रा. पी. व्ही. कुलकर्णी यालाही अटक करण्यात आली. कुलकर्णी हा परीक्षाप्रक्रियेशी संबंधित असल्याचे तपासात उघडकीस आले होते. प्रा. मोटेगावकर आणि प्रा. कुलकर्णी हे मूळचे लातूरचे आहेत.

## साखरपुड्यासाठी निघालेल्यांच्या टेम्पोला कंटेनरची धडक

### १३ जणांचा मृत्यू; अनेक जण जखमी, मृतांच्या वारसांना ५ लाखांची मदत



पालघर दि.१८ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील धानीवारी गावाजवळ मुंबई-अहमदाबाद महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात १३ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून सुमारे २० जण जखमी झाले आहेत. साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या टेम्पोला कंटेनरने जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात घडला. या घटनेमुळे संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. तसेच जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी प्रार्थना करत जिल्हा प्रशासनाशी सातत्याने संपर्क असल्याचे त्यांनी सांगितले.

सोमवारी सायंकाळी अंदाजे ४ वाजण्याच्या सुमारास धानीवारी गावाच्या हद्दीत हा अपघात घडला. प्राथमिक माहितीनुसार, साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी ३० ते ४० प्रवासी घेऊन जाणारा आयशर टेम्पो (एमएच ४८ डीसी ७४७४) मुंबई-गुजरात मार्गावर प्रवास करत होता. त्याचवेळी समोरून येणाऱ्या ट्रेलर (एनएल ०१ एसी ९११८) वरील कंटेनर बॉक्सने टेम्पोच्या डाव्या बाजूस जोरदार धडक दिली. या अपघातात एक मोटारसायकलही सापडली.

अपघातानंतर बचाव पथकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. १४ जखमींना डहाणू येथील वेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आले असून इतर जखमींना कासा उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

**अपघातातील मृतांची नावे**

सुरेश रत्ना लाखात, पांडू गणपत लाखात, काळू गोविंद लाखात, सुनील अर्जुन दांडेकर, चिमा गोविंद कुरहाडा, नमिता विठ्ठल दांडेकर, सारिका संतोष लाखात, आयुष सिताराम लाखात, सागर नामदेव शेंडे, वंदना शिवराम वळवी, सलोनी शिवराम वळवी, अजय अहाडी, रियांशी संतोष लाखात,

जिल्हा प्रशासन, पोलीस आणि आरोग्य यंत्रणा घटनास्थळी उपस्थित राहून मदतकार्य करत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावरून शोक व्यक्त करत मृतांच्या वारसांना राज्य सरकारतर्फे प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा केली. या दुर्घटनेतील जखमींवर सर्वोत्तम उपचार करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्याचं त्यांनी नमूद केले.

## विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर; १८ जूनला होणार मतदान

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- पावसाळी अधिवेशनाआधी विधान परिषदेच्या सदस्यसंख्येत आणखी भर पडणार असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ जागांसाठीची निवडणूक जाहीर झाली आहे. या जागांसाठी १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. विशेष म्हणजे, एकूण १७ जागांपैकी १६ जागांवर नियमित निवडणूक, तर एका ठिकाणी पोटनिवडणूक होत असून, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आमदार राहिलेल्या नागपूर विधान परिषद मतदारसंघासाठी ही पोटनिवडणूक पार पडणार आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्यामुळे या मतदारसंघांतील आमदारांचा कार्यकाळ संपुष्टात येऊनही निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या, परिणामी गेल्या दोन-अडीच वर्षांपासून या जागा रिक्त आहेत. दरम्यान, विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्यांपैकी २२ सदस्य हे स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून दिले जातात आणि नियमानुसार, संबंधित मतदारसंघातील एकूण मतदारसंख्येपैकी किमान ७५ टक्के मतदारसंख्या उपलब्ध असल्यास ही निवडणूक घेता येते.

जाहीर झालेल्या या निवडणुकीच्या वेळापत्रकानुसार, २५ मे रोजी निवडणुकीची अधिकृत अधिसूचना जारी केली जाईल, तर उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी १ जून ही शेवटची तारीख असेल. त्यानंतर २ जून रोजी उमेदवारी अर्जांची छाननी केली जाईल आणि उमेदवारांना अर्ज माघारी घेण्यासाठी ४ जूनपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या संपूर्ण प्रक्रियेनंतर १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान पार पडणार असून, अखेर २२ जून रोजी मतमोजणी केली जाईल. आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजी नगर-जालना आणि नागपूर या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांमध्ये ही निवडणूक पार पडू शकते.

## मान्सूनची भारताकडे दमदार आगेकूच; अंदमान-निकोबार पूर्ण व्यापले

नवी दिल्ली दि.१८ (वृत्तसंस्था)- देशातील शेतकरी बांधवांसाठी आणि सर्वसामान्यांसाठी एक अत्यंत आनंदाची बातमी आहे. वर्ष २०२६ च्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी भारताकडे आपली वाटचाल अधिक गतिमान केली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या ताज्या माहितीनुसार, आज १८ मे २०२६ रोजी मोसमी वाऱ्यांनी आग्नेय अरबी समुद्राच्या आणखी काही भागांत, कोमोरीन भाग आणि नैऋत्य व आग्नेय बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांमध्ये यशस्वी प्रगती केली आहे.

मोसमी वाऱ्यांनी अंदमान समुद्राचा बहुतांश भाग व्यापला असून, संपूर्ण अंदमान आणि निकोबार बेटांवर मान्सूनचे आगमन झाले आहे. याशिवाय, पूर्व-मध्य बंगालच्या उपसागराच्या काही भागांतही मान्सून दाखल झाला आहे. मान्सूनची ही प्रगती वेळेआधी आणि समाधानकारक मानली जात आहे.

हवामान खात्याने अंदाज वर्तवला आहे की, मोसमी वाऱ्यांच्या पुढील वाटचालीसाठी सध्या हिंदी महासागर आणि बंगालच्या उपसागरात अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. येत्या ३ ते ४ दिवसांत नैऋत्य मोसमी वारे आग्नेय अरबी समुद्र, कोमोरीन क्षेत्र, नैऋत्य आणि आग्नेय बंगालच्या उपसागराच्या उर्वरित भागांत तसेच पूर्व-मध्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांमध्ये वेगाने पुढे सरकतील. अंदमानमध्ये मान्सून वेळेत दाखल झाल्यामुळे आता भारताच्या मुख्य भूमीवर म्हणजेच केरळमध्ये मान्सून कधी धडकणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## निवडणुका झाल्यावर देश संकटात असल्याचे समजले का? संजय राऊतांची केंद्र सरकारवर टीका

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी आज पुन्हा एकदा केंद्र सरकारवर तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. मोदींच्या परदेश दौऱ्यावरून त्यांनी खोचक टोलेबाजी केली आहे. तसेच भाजपला सुखाची आणि अय्याशीची सवय लागली असल्याची टीका केली आहे. तसेच देशावर संकट आले आहे हे पश्चिम बंगालची निवडणूक झाल्यावर समजले का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

संजय राऊत म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहनानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मोटारसायकलवर कुठे तरी मंत्रालयात गेले होते आणि त्यासाठी पोलिसांनी संपूर्ण रस्त्याचा ताबा घेतला. भाजीवाले, फूलवाले, पेपरवाले सगळ्यांना उठवले. फूटपाथवरून लोकांना चालूच देत नव्हते. हे मी माझ्या मनाचे सांगत नाही, लोकांनी समोर आणलेल्या गोष्टी आहेत. भाजपने या ढोंगी प्रवृत्तीमधून बाहेर पडले पाहिजे. राष्ट्र संकटात आहे हे त्यांना बंगालच्या निवडणुका झाल्यानंतर समजले का? राष्ट्रांवर संकट वाढेल, गरीबी वाढेल, हे तुम्हाला निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर समजले का? असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, राहुल गांधींनी भाकीत केलेच होते, आम्ही सगळ्यांनी भाकीत केलेच होते की निवडणूक संपल्यावतर नरेंद्र मोदी हे आर्थिक संकटाचे बॉम्ब आपल्यावर टाकणार आहेत. आता मोदी कुठे आहेत? मोदी ७ यूरोपियन राष्ट्रांच्या दौऱ्यावर आहेत. आम्हाला म्हणतात परदेशात जाऊ नका आणि स्वतः ते परदेशात आहेत. त्यांच्या मंत्र्यांचे दौरेही सुरूच आहेत. मोदी दोन दिवस दिल्लीत दोन गाड्या घेऊन फिरत होते. तुम्ही काय पंडित नेहरू आहात का? एक गाडी घेऊन फिरायला. त्यांना आता सवय झाली आहे, सुखाची आणि अय्याशीची. ते ढोंग करत आहेत. त्यांना सुखाची आणि अय्याशीची चटक लागलेली आहे.

## ममता सरकारच्या धर्मआधारित मानधन योजना बंद

कोलकाता दि.१९ (वृत्तसंस्था)- पश्चिम बंगालमध्ये नव्याने सत्तेवर आलेल्या सुवेंदु अधिकारी सरकारने दुसऱ्याच कॅबिनेट बैठकीत अत्यंत मोठे आणि धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. राज्यातील धर्मआधारित मानधन योजना टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला असून, महिलांसाठी मात्र मोठी घोषणा केली आहे. भाजपच्या जाहीरनाम्यातील आश्वासनानुसार, राज्यातील महिलांना आता दरमहा ३,००० रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे.

कॅबिनेट बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना नगरविकास मंत्री अग्निमित्रा पॉल यांनी सांगितले की, मदरसा विभाग आणि माहिती व सांस्कृतिक विभागांतर्गत चालवल्या जाणाऱ्या सर्व धर्मआधारित आर्थिक साहाय्य योजना बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या सुरू असलेल्या योजना या महिन्याच्या अखेरपर्यंत सुरू राहतील आणि त्यानंतर त्या पूर्णपणे बंद केल्या जातील. यापूर्वीच्या तृणमूल काँग्रेस सरकारने २०१२ मध्ये मुस्लिम धर्मगुरूंसाठी (इमाम) ३,००० रुपये, तर सप्टेंबर २०२० मध्ये हिंदू पुरोहितांसाठी २,००० रुपये मासिक मानधन योजना सुरू केली होती. आता नवीन सरकारने ही भेदभाव करणारी व्यवस्था मोडीत काढण्याचे ठरवले आहे.

## निवडणुकीपूर्वी कांद्याला २४ रुपये, आता १२ रुपये दर

### रोहित पवारांचा देवेंद्र फडणवीसांवर घणाघात

नाशिक दि.१८ (प्रतिनिधी) राज्यात कांद्याला मिळणारा कवडीमोल भाव, आखाती देशातील युद्ध, निसर्गाचा प्रकोप आणि सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे पुरता अडचणीत आलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आज लासलगाव बाजार समितीत शेतकरी एल्गार आंदोलन पुकारले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार आणि दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी आणि नेत्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा घालून सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांचा तीव्र निषेध केला.

आमदार रोहित पवार यांनी स्वतः कांद्याने भरलेला ट्रॅक्टर चालवत बाजार समितीच्या आवारात प्रवेश केला, ज्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. या आंदोलनात पालघरचे माजी आमदार सुनील भुसारा, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर यांच्यासह हजारो कांदा उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान माध्यमांशी बोलताना आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेचा खरपूस समाचार घेतला. ते म्हणाले, "निवडणुकीच्या आधी सरकार कांद्याला २४ रुपये भाव जाहीर करते आणि निवडणूक संपताच १२ जाहीर करते. फडणवीस साहेब काल म्हणाले की, आम्ही साडेबारा रुपये देऊ, तुम्ही काय उपकार करत आहात का? अवकाळी पाऊस आणि गारपीठ झाल्यामुळे जिथे ५ ट्रेलर उत्पादन निघायचे तिथे आज ३ ट्रेलर निघत आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च प्रति किलो १८ रुपये होत असताना माल २ ते ३ रुपयांनी विकला जात आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी कांद्याला २२ ते २४ रुपये प्रति किलो दर मिळालाच पाहिजे, अशी मागणी त्यांनी लावून धरली.

रोहित पवार यांनी राज्य सरकार आणि नाफेडच्या कारभारावर गंभीर आरोप केले. "मागील वेळी सरकारने २०० रुपये कांदा अनुदान जाहीर केले, मात्र प्रत्यक्षात अवघे ५० रुपये दिले. उर्वरित १५० रुपयांचे काय झाले? नाफेडमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असून खरात या फेमस भोंदू बाबाने देखील नाफेड मार्फत पैसा खाल्ला, असा खळबळजनक आरोप त्यांनी केला. पाशा पटेल यांच्या समितीवर टीका करताना, "समिती स्थापन केली, त्यांनी मग काय भजे तळले का? दोन महिन्यात अहवाल देणार होते, त्याचे काय झाले?" असा टोलाही त्यांनी लगावला.

## पाकिस्तानकडून सौदीत ८ हजार सैनिक तैनात; इराण-अमेरिकेत मध्यस्थी करणाऱ्या 'पाक'च्या भूमिकेवर पुन्हा प्रश्नचिन्ह

इस्लामाबाद दि.१८ (वृत्तसंस्था)- पाकिस्तानने सौदी अरेबियामध्ये ८,००० सैनिक, लढाऊ विमानांची एक तुकडी आणि एक हवाई संरक्षण प्रणाली तैनात केली आहे, अशी माहिती पाकिस्तानमधील वरिष्ठ लष्करी सूत्रांनी सोमवारी रॉयटर्सला दिली. परस्पर संरक्षण कराराअंतर्गत पाकिस्तानकडून सैनिक तैनात केल्याची माहिती समोर आली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात मुख्य मध्यस्थी म्हणून भूमिका पार पाडत असताना पाकिस्तान सौदीला लष्करी मदत करत आहे. भविष्यात हल्ला झाल्यास आवश्यक मदतीसाठी ही तैनाती केल्याची माहिती समोर आलीय.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, पाकिस्तानी सैनिक सौदीमध्ये तैनात केल्याची पुष्टी सुरक्षा दलातील तीन अधिकारी आणि दोन सरकारी सूत्रांकडून करण्यात आली आहे.

सौदी अरेबियावर भविष्यात हल्ला झाल्यास आवश्यक मदत मिळावी या उद्देशाने पाकिस्तानकडून सैनिक तैनात करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, यावर पाकिस्तान आणि सौदी अरेबिया सरकारने अधिकृत भाष्य करण्याचे टाळले आहे. पाकिस्तान आणि सौदी यांच्या गेल्यावर्षी झालेल्या परस्पर संरक्षण करार पूर्णपणे गोपनीय असल्याचे सांगितले जाते.

## शेअर बाजारात मोठी घसरण, रुपया ९६.१७ च्या निचांकी पातळीवर

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल ११० डॉलरच्या पार गेल्याने आणि पश्चिम आशियातील सुरू असलेल्या भू-राजकीय तणावामुळे आणि युध्दाच्या परिस्थिती आणखी बिघडल्याने १८ मे रोजी भारतीय रुपया २१ पैशांच्या घसरणीसह उघडला. यामुळे रुपयाने आतापर्यंतची सर्वात निचांकी पातळी गाठली असून गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. मागील सत्रात रुपया प्रति डॉलर ९५.९६ वर बंद झाला होता, तो आज ९६.१७ रुपयांवर ट्रेड करत आहे. शुक्रवारीच रुपयाने पहिल्यांदा प्रति डॉलर ९६ रुपयांची मानसिक पातळी ओलांडली होती.

संयुक्त अरब अमिरातीमधील एका अणुऊर्जा प्रकल्पावर झालेल्या हल्ल्यानंतर आणि अमेरिका-इराण दरम्यान शांतता करारासाठी सुरू असलेले प्रयत्न धोक्यात आल्यामुळे ब्रेंट क्रूडच्या किमती रात्रीतून १ टक्क्यांहून अधिक वाढून प्रति बॅरल १११ डॉलरवर पोहोचल्या. याशिवाय, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यातील बैठकीतूनही कोणताही ठोस तोडगा निघू शकला नाही. तसेच, अमेरिकेतील मजबूत आर्थिक आकडेवारीमुळे अमेरिकन डॉलर वधारला आहे, ज्याचा फटका रुपयासह उदयोन्मुख बाजारपेठेतील मालमत्तांना बसला आहे. फिनरेक्स ट्रेझरी ॲडव्हायझर्सच्या विश्लेषकांनी सांगितले की, "आता केवळ युद्ध थांबणे आणि स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ पुन्हा खुले होणे यामुळेच डॉलर/रुपया जोडीची मागणी कमी होऊ शकते. अन्यथा, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने देशात डॉलरचा ओघ वाढवण्यासाठी कोणत्याही विशेष योजना जाहीर केल्या नाहीत, तर रुपया प्रति डॉलर १०० च्या पातळीवर देखील पोहोचू शकतो."

## चीनचा पाकिस्तानला अणुबॉम्ब हल्ल्याची 'ती' गुप्त सिस्टीम देण्यास साफ नकार

नवी दिल्ली दि.१८ (वृत्तसंस्था)- पाकिस्तान आणि चीन यांच्यातील 'कधीही न तुटणाऱ्या' मैत्रीला मोठा तडा गेल्याचे समोर आले आहे. पाकिस्तानने भारताला टक्कर देण्यासाठी चीनकडे समुद्रातून अण्वस्त्र हल्ला करण्याची अत्यंत संवेदनशील 'सेकंड-स्ट्राईक'सिस्टीम मागितली होती. मात्र, चीनने पाकिस्तानची ही मागणी अत्यंत 'अवाजवी' असल्याचे सांगत ती थेट फेटाळून लावली आहे. 'ड्रॉप साइट न्यूज'ने लीक केलेल्या काही गुप्त राजनैतिक दस्तऐवजांमधून हा खळबळजनक खुलासा झाला आहे. 'सेकंड-स्ट्राईक' क्षमता म्हणजे जर एखाद्या शत्रू देशाने अचानक अण्वस्त्र हल्ला करून पाकिस्तानचे जमिनीवरील सर्व तळ उद्ध्वस्त केले, तरीही समुद्रात लपलेल्या पाणबुडीद्वारे पाकिस्तान समोरच्या देशावर पलटवार (अण्वस्त्र हल्ला) करू शकेल. ही क्षमता प्रामुख्याने 'न्यूक्लियर पॉवर्ड बॅलिस्टिक मिसाईल सबमरीन' म्हणजेच अणुऊर्जेवर चालणाऱ्या पाणबुड्यांवर अवलंबून असते, ज्या समुद्राच्या खोल पाण्यात महिनान महिने लपून राहू शकतात.

## गाडीत डिझेल नाही, बेपत्ता मुलीला शोधण्याची जबाबदारी पोलिसांनी झटकली; काँग्रेसचा घणाघात

नागपूर दि.१८ (प्रतिनिधी)- एक मुलगी बेपत्ता झाल्यानंतर नागपूर पोलिसांनी गाडीत डिझेल नसल्यामुळे तिला शोधण्याची जबाबदारी झटकल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. देशाला अमृतकालची स्वप्ने दाखवणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या राजवटीत आज पोलिस स्टेशनची गाडी डिझेल अभावी बंद पडतेय. हा अमृतकाल नाही, तर व्यवस्थेच्या अपयशाचा काळ आहे, अशी टीका काँग्रेसने या प्रकरणी केली आहे.

नागपूर शहरातील पाचपावली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एक मुलगी नुकतीच बेपत्ता झाली आहे. त्यानंतर तिच्या कुटुंबीयांनी तात्काळ पोलिसांकडे धाव घेतली. पण पोलिसांनी गाडीत डिझेल नाही, त्यामुळे शोधासाठी जाता येत नाही, असे कारण देत मुलीचा शोध घेण्यास नकार दिला. कुटुंबीयांच्या मते, मुलगी बेपत्ता झाल्यानंतर आमच्यासाठी प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता. या प्रकरणी पोलिसांकडून तत्पर कारवाई अपेक्षित होती. पण मुलगी २१ वर्षांची असल्यामुळे ती तिचे निर्णय घेऊ शकते, तिला कुठे जायचे ते जाऊ शकते, असे सांगत पोलिसांनी या प्रकरणी तत्परता दाखवली नाही.

पोलिसांच्या या बेजबाबदारपणावर आता स्थानिक नागरीक व सामाजिक कार्यकर्त्यांनी टीका केली आहे. मुलींच्या सुरक्षेवर मोठमोठ्या घोषणा केल्या जातात, पण प्रत्यक्षात त्यांचा शोध घेण्यासाठी आवश्यक मुलभूत सुविधांचाच अभाव आहे. या परिस्थितीत नागरिकांनी कुणावर विश्वास ठेवायचा? असा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही या प्रकरणी सरकार व पोलिस प्रशासनावर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, नागपूरसारख्या उपराजधानीत एक अल्पवयीन मुलगी बेपत्ता होते आणि पोलिसांचं उत्तर काय? गाडीत डिझेल नाही, शोधायला कसं जाणार? हा फक्त बेजबाबदारपणा नाही, तर संपूर्ण व्यवस्थेचं दिवाळं निघाल्याची कबुली आहे. नागपूर पोलिसांच्या गाडीत डिझेल नसेल तर मग राज्यात रुग्णवाहिका पासून इतर अत्यावश्यक सुविधांची काय अवस्था आहे याचे हे विदारक चित्र आहे! भाजपच्या जाहिरातींमध्ये सुरक्षित महाराष्ट्र दाखवला जातो, पण वास्तवात पोलिसांकडे बेपत्ता झालेली मुलगी शोधायला डिझेलसुद्धा नाही?! राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांचे हजारो कोटींचे इव्हेंट, सेल्फी, प्रचार आणि पीआरसाठी पैसा आहे, पण नागरिकांच्या सुरक्षेसाठी नाही? मग ते बाईकवरून प्रवास केल्याचा काय उपयोग झाला? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काटकसर करण्याचे आवाहन केले ते पोलिसांनाही लागू केलं का? मुली बेपत्ता असताना सुद्धा डिझेल वाचवणे महत्वाचे वाटते का? गृहमंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात ही अवस्था असेल तर संपूर्ण राज्यात विचारण्याची सोय नाही.

# कसा असेल यंदाचा मान्सून?

पाऊस कमी पडण्याचा अंदाज चिंताजनक ठरतो. अंदाज खरा ठरून पाऊस कमी पडल्यास शेतकरी, सरकार, उद्योग आणि वित्तीय संस्था आदी घटक अडचणीत येतात. त्यामुळे या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी समन्वयित आणि दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक आहेत. योग्य नियोजन, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि तंत्रज्ञानाचा योग्य अवलंब यांद्वारे या संकटाचे परिणाम कमी करता येऊ शकतात.

स्कायमेट आणि भारतीय हवामान विभागाचे येत्या पावसाळ्याविषयी जाहीर झालेले अंदाज बहुतांश सारखेच असून सामान्यपेक्षा कमी पाऊस पडणार आहे. त्याची तुलना लगेच २०१४-१५ च्या दुष्काळी वर्षांशी व्हायला लागली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन महिन्यांपासून कमी पावसाच्या अंदाजानुसार खरीप हंगामाचे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यात खरिपाखालचे क्षेत्र पाच लाख हेक्टरने कमी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मे म हिन्यात पावसाचा आणखी एक अंदाज येणार आहे. त्यातच पाऊस १५ दिवस अगोदर महाराष्ट्रात दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. कमी काळात जास्त पाऊस झाला, तरी त्याचा उपयोग नसतो. कमी पावसाचा अंदाज व्यक्त झाला, की त्याचे पडसाद केवळ हवामानापुरते मर्यादित राहत नाहीत, तर थेट देशाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात. भारतासारख्या कृषिप्रधान देशात मॉन्सून हा अर्थचक्राचा कणा मानला जातो. त्यामुळे मॉन्सून कमी होण्याची शक्यता व्यक्त होताच शेतकरी, धोरणकर्ते आणि रिझर्व्ह बँक यांच्यासह संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्यांच्या मनात चिंता निर्माण होते. भारताम ध्ये सुमारे पन्नास टक्क्यांहून अधिक शेती अजूनही पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाचा अंदाज कमी असल्यास सर्वप्रथम फटका बसतो, तो शेतकऱ्यांना. पेरणी उशिरा होते, काही ठिकाणी पेरणीच होत नाही, तर काही भागात उगवलेले पीक टिकवणे कठीण जाते. पाण्याअभावी उत्पादन घटते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर याचा थेट परिणाम होतो.

शेती उत्पादन कमी झाल्यास ग्रामीण भागातील खरेदीशक्ती घटते. ती संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची असते. ग्रामीण मागणी कमी झाली, की उद्योग, सेवा आणि इतर क्षेत्रांवरही परिणाम दिसून येतो. अडचणीच्या काळात ग्रामीण मागणीनेच अर्थव्यवस्था सावरली आहे, हे दिसून आले आहे. मॉन्सून कमी राहण्याचा दुसरा मोठा परिणाम अन्नधान्याच्या उत्पादनावर होतो. धान्य, डाळी, तेलबिया, ऊस यांसारख्या पिकांचे उत्पादन घटल्यास बाजारात पुरवठा कमी होतो. पुरवठा कमी आणि मागणी कायम असल्यामुळे किमती वाढतात. परिणामी महागाईला चालना मिळते. विशेषतः अन्नमहागाई वाढल्यास सर्वसामान्य नागरिकांवर परिणाम होतो. घरगुती बजेट बिघडते आणि खर्चाचे नियोजन बदलावे लागते. महागाई वाढल्यास रिझर्व्ह बँकेसारख्या केंद्रीय बँकेसमोर मोठे आव्हान उभे राहते. महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी व्याजदर वाढवावे लागतात किंवा इतर कडक आर्थिक धोरणे अवलंबावी लागतात; म त्र व्याजदर वाढल्यास उद्योगांना कर्ज महाग होते. गुंतवणूक कमी होते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावू शकतो. त्यामुळे एका बाजूला महागाई नियंत्रित करणे आणि दुसऱ्या बाजूला आर्थिक वाढ टिकवणे, हे संतुलन राखणे कठीण बनते. वित्तीय तूट नियंत्रणात राखण्याचा आणि महागाईचा परस्परांशी संबंध असल्याने त्याचा पावसाशीही संबंध येतो.

शासनकर्त्यांसाठी ही परिस्थिती आव्हानात्मक असते. कमी पावसामुळे शेती संकटात आल्यास सरकारला शेतकऱ्यांसाठी मदत योजना जाहीर कराव्या लागतात. कर्जमाफी, अनुदान, पीकविमा भरपाई यांसारख्या उपाययोजना कराव्या लागतात. तसेच पाणीटंचाई असलेल्या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा, जलसंधारण प्रकल्प, सिंचन सुविधा यावर अतिरिक्त खर्च करावा लागतो. या सर्वांमुळे सरकारचा महसूल ताणला जातो आणि वित्तीय तुटीवर दबाव वाढतो. कमी मॉन्सूनचा परिणाम आयात-निर्यात धोरणावरही होतो. देशांतर्गत उत्पादन कमी झाल्यास अन्नधान्य आणि इतर कृषी वस्तूंची आयात वाढवावी लागते. उदाहरणार्थ, डाळी, खाद्यतेल किंवा साखरेच्या बाबतीत उत्पादन घटल्यास आयातीवर अवलंबित्व वाढते. यामुळे परकीय चलनाचा खर्च वाढतो आणि व्यापार तूट वाढण्याची शक्यता निर्माण होते. दुसरीकडे, काही पिकांचे उत्पादन घटल्यामुळे निर्यात कमी करावी लागते किंवा त्यावर निर्बंध घालावे लागतात; जेणेकरून देशांतर्गत पुरवठा कायम राहील. याचा परिणाम जागतिक बाजारातील भारताच्या प्रतिमेवरही होऊ शकतो. ऊर्जा क्षेत्रावरही मॉन्सूनचा परिणाम होतो. जलविद्युत प्रकल्प पावसावर अवलंबून असल्याने पाणीसाठा कमी असल्यास वीजनिर्मिती घटते. परिणामी, इतर स्त्रोतांवर, विशेषतः कोळसा आणि गॅसवर अवलंबित्व वाढते. यामुळे ऊर्जा खर्च वाढतो आणि उद्योगांवर परिणाम होतो. तसेच पाणीटंचाईमुळे शहरांमध्येही पाणीपुरवठ्यावर ताण येतो. त्यामुळे नागरी जीवनावर परिणाम होतो.


पावसाविषयीचा अंदाज व्यक्त झाल्यानंतर नवी मुंबईसह राज्यातील अन्य शहरात पाण्याच्या वितरणात काही प्रमाणात कपात सुरू झाली. लातूरला मिरजहून पाणी दिल्याच्या आठवणी आणि कोपरगाव, मनमाडसारख्या शहरांमध्ये महिन्यातून एकदाच पाणी असे निर्णयही लगेच पुढे येतात. शहरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याला मर्यादा येतात. टँकर लॉबी कमी पावसाचा कसा फायदा घेते आणि त्यातून कसे आणि किती घोटाळे होतात, याबाबतच्या तक्रारी नवीन नाहीत. मॉन्सून कमी असल्यास ग्रामीण रोजगारावरही परिणाम होतो. शेतीतील कामे कमी झाल्यामुळे मजुरांना रोजगार मिळणे कठीण होते. यामुळे स्थलांतर वाढून शहरांवर ताण वाढतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील मंदीमुळे एकूण देशांतर्गत मागणी कमी होते. त्याचा परिणाम जीडीपी वाढीवर होऊ शकतो. याशिवाय, मानसशास्त्रीय परिणामही दुर्लक्षित करता येत नाही. शेतकऱ्यांमध्ये अनिश्चितता वाढते, कर्जाचा बोजा वाढतो आणि मानसिक तणाव निर्माण होतो. आत्मविश्वास कमी होतो, त्याचा परिणाम पुढील हंगामातील निर्णयांवर होऊ शकतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ आर्थिक नसून सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा महाराष्ट्राला लागलेला शाप आहे. कमी पाऊस, कमी उत्पादन आणि जगण्याच्या संघर्षातून वाढणाऱ्या आत्महत्या या चक्रातून महाराष्ट्राची सुटका व्हायला तयार नाही. त्याचे कारण पुन्हा पावसावरचे जास्त अवलंबित्व हेच आहे. या पार्श्वभूमीवर सरकार आणि वित्तीय संस्था विविध उपाययोजना करण्याचा प्रयत्न करतात. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पिकांचे विविधीकरण, हवामान अंदाजाची अचूकता वाढवणे, तंत्रज्ञानाचा वापर यांवर भर दिला जातो. तसेच शेतकऱ्यांना हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी प्रशिक्षण आणि आर्थिक मदत दिली जाते.

# !! क्रियानंद स्वामी उर्फ जेम्स डोनाल्ड वॉल्टर्स: अमेरिकन हिंदू धार्मिक नेते !!

**क्रियानंद** स्वामी उर्फ जेम्स डोनाल्ड वॉल्टर्स हे अमेरिकन हिंदू धार्मिक नेते, योगगुरू, ध्यान शिक्षक, संगीतकार आणि लेखक होते. ते परम हंस योगानंद यांचे थेट शिष्य होते आणि आनंद नावाच्या आध्यात्मिक चळवळीचे संस्थापक होते. त्यांनी असंख्य गाणी आणि डझनभर पुस्तके लिहिली. एलए टाईम्सच्या मते, त्यांच्या कामाची मुख्य थीम करुणा आणि नम्रता होती, परंतु ते एक वादग्रस्त व्यक्तिमत्व होते. क्रियानंद आणि आनंदा यांच्यावर कॉपीराइट समस्या, लैंगिक-छळ आणि नंतर कथित फसवणूक आणि कामगार कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल खटला भरण्यात आला होता. खुशखुशित रोचक संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या लेखात आहे... संपादक.

वयाच्या २२व्या वर्षी वॉल्टर्स योगानंदांना भेटले, त्यांचे शिष्य बनले. नंतर १९५२मध्ये गुरू योगानंदाचे निधन झाल्यानंतर त्यांनी सेल्फ-रिलायझेशन फेलोशिप- एसआरएफ आश्रमात सेवा सुरू ठेवली. सन १९५५मध्ये वॉल्टर्स यांना संन्यासाची शपथ देण्यात आली आणि सरोलानंद, बिमलानंद आणि भक्तानंद यांच्यासह दया माता, तत्कालीन एसआरएफ अध्यक्षांनी एसआरएफ ऑर्डरचा भाऊ म्हणून नियुक्त केले आणि त्यांना क्रियानंद हे नाव देण्यात आले. सन १९६०मध्ये एम.डब्ल्यू.लुईसचे निधन झाल्यावर एसआरएफ संचालक मंडळाने क्रियानंद यांची संचालक मंडळावर आणि अखेरीस उपाध्यक्षपदी निवड केली. सन १९६२मध्ये संचालक मंडळाने त्यांना एसआरएफमधून काढून टाकण्यासाठी एकमताने मतदान केले आणि त्यांच्या राजीनाम्याची विनंती केली. क्रियानंद यांनी योगानंदांच्या जागतिक बंधुता वसाहतींच्या आदर्शावर आधारित आनंद या धार्मिक आणि सांप्रदायिक संघटनांची जागतिक चळवळ स्थापन केली.

क्रियानंद- जे डोनाल्ड वॉल्टर्स यांचा जन्म दि.१९ मे १९२६ रोजी टेलीजेन, रोमानिया येथे अमेरिकन पालक रे.पी. आणि गर्ट्रूड जी वॉल्टर्स यांच्या घरी झाला. त्यांचे वडील एस्सो कॉर्पोरेशनमध्ये तेल भूगर्भशास्त्रज्ञ होते, ज्यांना नंतर रोमानियन तेलक्षेत्रात नियुक्त केले गेले. रोमानिया, स्वित्झर्लंड, इंग्लंड आणि युनायटेड स्टेट्समध्ये त्यांनी आंतरराष्ट्रीय शिक्षण घेतले. त्याने हेव्हरफोर्ड कॉलेज आणि ब्राउन युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेतले, नंतर त्यांच्या वरिष्ठ वर्षात सोडले. त्यानंतर स्टेजक्राफ्टचा अभ्यास करण्यासाठी ते दक्षिण कॅरोलिनाला गेले. तेथे गेल्यानंतर वॉल्टर्सने भगवद्गीता वाचली आणि नंतर योगानंद यांचे योगींचे आत्मचरित्र वाचले. वॉल्टर्सच्या म्हणण्यानुसार त्यांना न्यूयॉर्क शहरातील पुस्तकांच्या दुकानात आत्मचरित्र सापडले आणि त्यामुळे त्यांचे जीवन बदलले. ते शाकाहारी बनले आणि सन १९४८मध्ये योगानंदांच्या शिष्यांपैकी एक बनण्यासाठी त्यांनी दक्षिण कॅलिफोर्नियाला बसने क्रॉस-कंट्री प्रवास केला. ते लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया येथे आल्यावर, वॉल्टर्स योगानंदांना भेटले आणि वॉल्टर्सच्या आत्मचरित्रानुसार शिष्यत्व आणि त्यागाची शपथ घेतली. वॉल्टर्सने लवकरच योगानंदांच्या सेल्फ-रिलायझेशन फेलोशिप संस्थेमध्ये नेतृत्वाचे स्थान प्राप्त केले आणि व्याख्याता म्हणून काम केले. दि.७ मार्च १९५२ रोजी परमहंस योगानंद हे अमेरिकेतील अभ्यागत भारतीय राजदूत बिनय रंजन सेन आणि त्यांच्या पत्नीसाठी लॉस एंजेलिसच्या डाउनटाउनमधील बिल्टमोर हॉटेलमध्ये आयोजित मेजवानीत वक्ते होते. भाषण देत असताना योगानंद अचानक जमिनीवर कोसळले आणि त्यांचा मृत्यू झाला, तेव्हा वॉल्टर्स सभागृहात उपस्थित होते. सन १९५३मध्ये एसआरएफने वॉल्टरचे स्टोरीज ऑफ मुकुंदा हे पुस्तक प्रकाशित केले. तद्नंतर वॉल्टर्स एसआरएफच्या हॉलीवूड केंद्रात मुख्य मंत्री बनले. यावेळी त्यांनी संन्यास आणि क्रियानंद हे मठ नावाचे पुढील व्रत घेतले. एसआरएफच्या नियतकालिकानुसार सन १९५५पासून २०१०पर्यंत एसआरएफच्या अध्यक्षा दया माता यांनी शंकराचार्यांच्या स्वामी आदेशात त्यांना संन्यासाची अंतिम शपथ दिली होती. या आदेशाबाबत योगानंद यांनी त्यांच्या आत्मचरित्रात म्हटले आहे- 'प्रत्येक स्वामी हा प्राचीन मठातील आहे, जो शंकराने सध्याच्या स्वरूपात आयोजित केला होता. कारण हा एक औपचारिक आदेश आहे, सक्रिय नेते म्हणून सेवा करणाऱ्या संत प्रतिनिधींच्या अखंड ओळीसह, कोणताही माणूस स्वतःला स्वामी ही पदवी देऊ शकत नाही. तो हक्काने दुसऱ्या स्वामीकडूनच प्राप्त करतो; अशाप्रकारे सर्व भिक्षू त्यांचा आध्यात्मिक वंश एका सामान्य गुरू भगवान शंकराकडे शोधतात. दारिद्र्य, पवित्रता आणि अध्यात्मिक गुरूच्या आज्ञापालनाच्या प्रतिज्ञा करून, अनेक कॅथोलिक ख्रिश्चन मठांचे आदेश स्वामींच्या ऑर्डरसारखे दिसतात.'



सन १९६०मध्ये एसआरएफ मंडळाचे सदस्य आणि उपाध्यक्ष एम.डब्ल्यू.लुईस यांच्या निधनानंतर एसआरएफ संचालक मंडळ, जे योगानंदांनी मंडळावर नियुक्त केलेले थेट शिष्य होते, त्यांनी क्रियानंद यांची मंडळाचे सदस्य आणि उपाध्यक्ष म्हणून निवड केली. सन १९६२मध्ये डिसमिस होईपर्यंत त्यांनी त्या पदावर काम केले. सन १९६२पर्यंत एसआरएफची सेवा करत क्रियानंद भारतातच राहिले, तेव्हा संचालक मंडळाने त्यांच्या राजीनाम्याची विनंती करण्यासाठी एकमताने मतदान केले. फिलिप गोल्डबर्गच्या म्हणण्यानुसार तो स्वतःची सेवा करत होता, याशिवाय संस्था नक्की का सांगणार नाही. क्रियानंद यांना असे वाटले की, एसआरएफमधून काढून टाकणे अन्यायकारक आहे. क्रियानंदने सन १९६८मध्ये नेवाडा सिटी, कॅलिफोर्नियाजवळ ४० एकर जमिनीवर जागतिक ब्रदरहुड कॉलनी म्हणून आनंदा व्हिलेजची स्थापना केली. रिचर्ड बेकर, गॅरी स्नायडर, आणि ऑलेनबर्ग यांच्याकडून विकत घेतलेल्या १६० एकर पार्सलचा तो भाग होता.क्रियानंदने विविध रिट्रीट सेंटर्सची स्थापना केली: विस्तारित प्रकाश योग आणि ध्यान रिट्रीट आणि जवळील आनंद मेडिटेशन रिट्रीट, दोन्ही नेवाडा सिटी, कॅलिफोर्नियाजवळ स्थित आहेत; ॲसिसी, इटलीजवळ आनंदा असोसिएझिओन आणि आनंदा गुडगाव, भारत हे होत. दि.८ मार्च १९८९ रोजी कॅलिफोर्नियातील क्रियानंदच्या वर्ल्ड ब्रदरहुड कॉयरने व्हॅटिकन येथे पोप जॉन पॉल-२ यांच्या सार्वजनिक श्रोत्यांमध्ये १० हजार लोक उपस्थित असताना गायले होते.

जरी ते वादग्रस्त आणि विरोधाभासी होते, तरीही त्यांनी करुणा आणि नम्रता यासारख्या थीमद्वारे एकत्रितपणे अनेक गाणी आणि डझनभर पुस्तके लिहिली. सन २०१०च्या यूएसए बुक न्यूज अवॉर्ड्समध्ये त्यांच्या एका पुस्तकाचा गौरव करण्यात आला आहे. त्यांचे वयाच्या ८६व्या वर्षी दि.२१ एप्रिल २०१३ रोजी असिसी, इटली येथे दुःखद निधन झाले. त्यांनी जगभरातील विविध देशांमध्ये व्याख्याने दिली. इंग्रजी व्यतिरिक्त ते इटालियन, रोमानियन, ग्रीक, फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन, हिंदी, बंगाली आणि इंडोनेशियन भाषा बोलले आणि यापैकी अनेक भाषांमध्ये त्यांनी शिकवले, हे विशेष!

!! क्रियानंदजींना जयंतीदिनी करोडो विनम्र अभिवादन जी !!

-संकलन व सुलेखन -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली, जि.गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

## नीट-यूजी परतावा प्रक्रियेत पारदर्शकतेची मागणी निखिल काकडे यांचे जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन




छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी)- नीट-यूजी परीक्षा परतावा प्रक्रियेत पारदर्शकता राखून ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांचे हित सुरक्षित ठेवावे, या मागणीसाठी युवा नेते निखिल काकडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर केले. उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संगीता राठोड यांना हे निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अनेक विद्यार्थ्यांनी सायबर कॅफे व महा ई-सेवा केंद्रांमार्फत रोख रकमेने अर्ज प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यामुळे परताव्याची रक्कम थेट विद्यार्थी अथवा पालकांच्या खात्यात जमा व्हावी, यासाठी योग्य पडताळणी व्यवस्था उभारावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच सायबर कॅफे व सेवा केंद्रांवर प्रशासनाने देखरेख ठेवावी, विद्यार्थ्यांसाठी तक्रार निवारण दूरध्वनी सेवा सुरू करावी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांचे संरक्षण सुनिश्चित करावे, अशा मागण्यांचाही निवेदनात समावेश होता. देशभरातून २२ लाख ७६ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा दिली असून महाराष्ट्रातून २ लाख ४० हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

## मनपा समर कॅम्पला आयुक्त अमोल येडगे यांची भेट



छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी)- महानगरपालिका आयोजित समर कॅम्पला मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी भेट देत विविध ऑलिम्पिक क्रीडा प्रकारांची पाहणी केली. गरवारे स्टेडियम येथे आयोजित करण्यात आलेल्या या समर कॅम्पमध्ये त्यांनी विशेषतः फेंसिंग क्रीडा प्रकाराची सविस्तर माहिती जाणून घेतली.

फेंसिंग प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेले साहित्य, सराव पद्धती, खेळाडूंची तयारी तसेच राष्ट्रीय स्पर्धांमधील सहभाग याबाबत आयुक्तांनी प्रशिक्षक आणि खेळाडूंशी संवाद साधला. मनपाच्या खेळाडूंनी भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच फेंसिंग खेळासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचा हॉल व अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका सकारात्मक प्रयत्न करेल, असे आश्वासनही त्यांनी दिले. समर कॅम्पमध्ये सुरू असलेल्या फेंसिंग प्रशिक्षणाचे त्यांनी कौतुक केले. यावेळी क्रीडा अधिकारी संजीव बालया, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त मनपा क्रीडा मार्गदर्शक सागर मगरे तसेच संतोष अवचार उपस्थित होते. मनपा प्रशासनाच्या वतीने शहरातील खेळाडूंना अधिकाधिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी आयुक्तांनी सांगितले

# बेगमपुरा हेरिटेज वॉक: २५० हून अधिक नागरिकांसह पालिका प्रशासनाची ऐतिहासिक सफर

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) - ऐतिहासिक वारसा जपणे आणि नागरिकांमध्ये शहराच्या संस्कृतीबद्दल जनजागृती निर्माण करणे, या उद्देशाने आज रविवारी सकाळी 'बेगमपुरा हेरिटेज वॉक' (वारसा सफर) चे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि 'इन्टॅक' (खछढअउक - इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरिटेज) च्या छत्रपती संभाजीनगर चॅप्टरच्या वतीने या संयुक्त उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जुन्या शहराच्या वेशीबाहेर वसलेल्या बेगमपुरा भागातील जिवंत इतिहासाचा अनुभव घेण्यासाठी तब्बल २५० हून अधिक सजग नागरिक या सफरीमध्ये सहभागी झाले होते.

या हेरिटेज वॉकचे मार्गदर्शन 'इन्टॅक'चे सदस्य संकेत कुलकर्णी आणि आदित्य वाघमारे यांनी केले. या उपक्रमात शहराचे महापौर समीर राजूरकर, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, उपायुक्त अंकुश पांढरे आणि 'इन्टॅक'च्या निमंत्रक (उेर्पींशपेी) माया वैद्य यांच्यासह स्थानिक इतिहासकार, विद्यार्थी आणि वारसा प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदवला.

इतिहासाच्या पाऊलखुणांचा मागोवा : सकाळी ठीक ७:०० वाजता ऐतिहासिक 'थत्ते हौद' येथून या दोन तासांच्या सफरीला



सुरुवात झाली. हा हौद म्हणजे तत्कालीन प्रगत जलव्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना आहे. तिथून पुढे बेगमपुरातील गल्लीबोळांमधून फिरताना मार्गदर्शकांनी अनेक दडलेल्या ऐतिहासिक

**कथांना उजाळा दिला :** जुने वाडे आणि मंदिरे: या भागातील जुन्या वास्तू आणि मंदिरांमधून तत्कालीन सामाजिक सलोखा आणि पारंपरिक निवासी स्थापत्यशैलीचे दर्शन घडले. यावेळी थत्ते नहर, थत्ते परिवाराचे शहारासाठीचे योगदान यावेळी सांगण्यात आले.

**मुघलकालीन दिवाणखाना :** ऐतिहासिक पटेल वाड्यात मुघल काळातील भव्य राहणीम ान आणि त्या काळातील वास्तुकलेची झलक यावेळी नागरिकांना पाहायला मिळाली.

**हनुमान व्यायामशाळा :** जुन्या काळातील पारंपरिक कुस्तीच्या आखाड्याला (व्यायाम शाळेला) भेट देऊन शहराच्या क्रीडा आणि म ल्लविद्येच्या परंपरेची माहिती घेण्यात आली.

**कुंभारगल्ली :** या सफरीचा समारोप कुंभारगल्लीतील पारंपरिक भट्ट्यांजवळ झाला. येथे पिढ्यानपिढ्या मातीची भांडी बनवण्याची कला जिवंत ठेवणाऱ्या स्थानिक कारागिरांशी नागरिकांनी संवाद साधला. या प्रसंगी डॉ. हंसराज डोंगरे यांनी कुंभारगल्लीच्या वैशिष्ट्यांचे सविस्तर वर्णन केले.

**शहराच्या वारशासाठी एकत्र येऊया :**

मान्यवरांचे आवाहन - याप्रसंगी बोलताना महापौर समीर राजूरकर यांनी नागरिकांना आपल्या ऐतिहासिक मुळांशी जोडण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, 'बेगमपुरा परिसराला एक वेगळी ओळख असून तो आपल्या वैभवशाली भूतकाळाला वर्तमानाशी जोडणारा दुवा आहे. रविवारी सकाळी एवढ्या मोठ्या संख्येने नागरिक, विशेषतः तरुण पिढी, या उपक्रमात सहभागी झाली, यावरून आपल्या शहराचे हृदय येथील वारशासाठी धडधडत असल्याचे दिसून येते.' 'इन्टॅक' चॅप्टरच्या निमंत्रक माया वैद्य म्हणाल्या, 'वारसा म्हणजे केवळ दगडी वास्तू नव्हेत, तर त्यांच्यात राहणारा जिवंत समाज आणि संस्कृती आहे. आजच्या 'हेरिटेज वॉक'सारखे सामूहिक प्रयत्न बेगमपुराचा हा समृद्ध इतिहास पुढच्या पिढीपर्यंत जसाच्या तसा पोहोचवण्यास नक्कीच मदत करतील.' आपल्या शहरातील ऐतिहासिक वास्तूंचे रक्षण करणे आणि सांस्कृतिक वारशाबद्दल आदर बाळगण्याचा संकल्प सर्व उपस्थित नागरिकांनी केला. या सामूहिक प्रतिज्ञेने या यशस्वी सफरीचा समारोप झाला.

# मराठा टुरिझम प्रकल्प आणि राष्ट्रीय स्तरावर शिवजयंतीची घोषणा केंद्राने करावी - दिल्लीत मागणी

नवी दिल्ली, दि. १८ (वृत्तसंस्था) –दिल्लीच्या तख्तासमोर मराठ्यांच्या स्वाभिमानाचा हुंकार देत केंद्र शासनाने मराठा टुरिझम प्रकल्प आणि राष्ट्रीय स्तरावर १९ फेब्रुवारी हा दिवस देशभरात शासकीय स्तरावर ग्रामपंचायत ते राज्याचे मंत्रालय येथे शिवजयंती साजरी करण्याची घोषणा केंद्र शासनाने तात्काळ करावी अशी मागणी अखिल भारतीय छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर भाऊ चव्हाण यांनी दिल्लीत महाराष्ट्र सदन येथे १४ तारखेला साजऱ्या करण्यात आलेल्या ३६९ वी जयंती उत्सव कार्यक्रमात महत्वपूर्ण मागणी केली.देशाच्या राजधानीत जयंतीचा उपक्रम सातत्याने मागील चार वर्षांपासून होत आहे.



या बाबत सविस्तर माहिती देतांना ते म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर येथे १९९६ पासुन छावा मराठा युवा संघटनेने महाराष्ट्रात साजरी करण्याची सुरुवात झाली असुन २०२३ तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांचे जयंतीस मान्यता दिल्या मुळे २०२३ पासुन राजधानी दिल्लीत साजरी होत असुन हे राजधानी दिल्लीत जयंती साजरी करण्याचे सलग चौथे वर्ष असुन केंद्र शासनाने 'मराठा पर्यटन ' सुरु करावे, देशाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंतीस देशभर शासकीय स्तरावर साजरी करण्याची मान्यता द्यावी आणि या मागणीची पूर्तता व्हावी म्हणुन राजधानी दिल्लीत छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी करतांना छत्रपती संभाजी महाराजांचे कार्य व शौर्य देशभरात घराघरात पोहचावे या शुद्ध हेतुने राजधानी दिल्लीत हा महोत्सव साजरा होत असल्याचे प्रतिपादन संस्थापक अध्यक्ष किशोर भाऊ चव्हाण यांनी केले.

२०२६च्या कार्यकारिणी मध्ये अध्यक्ष म्हणुन इंजि.तानाजी हुस्सेकर, स्वागत अध्यक्ष म्हणून आ.संजय केणेकर, मराठा रामनारायण तर कार्याध्यक्ष पदी डॉ. राजेंद्र दाते पाटील यांची निवड जाहीर करण्यात आली होती त्या मध्ये उपाध्यक्ष- शशिकांत सिरसाठ,प्राडॉ.कमलाकर कणसे, प्रा.डॉ. प्रभाकर जाधव तर सरचिटणीस- सदिप सरकटे, प्रदिप बिल्लोरे, डॉ. अविनाश पुयड, शिवानंद पाटील तर सचिव म्हणून डॉ. उध्दव काळे,माधव आवरगंड,प्रा. अरविंद बोधनकर तर कोषाध्यक्ष म्हणुन अशोक खानापुरे, रवि भारद्वाज, लक्ष्मी धिमन,अक्षय ताठे, मच्छिंद्र घोरपडे आदींची निवड घोषित करण्यात आली होती.

'पानिपतनंतरही मराठ्यांनी खचून न जाता १७७१ मध्ये महादजी शिंदे महाराज यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीवर पुन्हा भगवा फडकावला. हाच स्वाभिमान आणि लढाऊ वृत्ती आजच्या तरुणाईने जोपासणे ही काळाची गरज आहे,' असे प्रतिपादन अध्यक्ष पदावरून बोलतांना वैभव डांगे यांनी केले.

दिल्लीवर जयंतीच्या निमित्ताने भगवा फडकावणारा स्वाभिमान आज या ठिकाणी पाहायला मिळत आहे. मराठ्यांचा इतिहास हा केवळ पराभवाचा नाही, तर फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून पुन्हा झेप घेण्याचा आहे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना वर्ष २०२६ वर्षाचे अखिल भारतीय छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर यांनी केले.

या सोहळ्यात कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरला तो छत्रपती संभाजी महाराजांच्या पोशाखात आलेला छोटा रायबा सूर्यवंशी. त्याच्या निरागस पण बाणेदार बोबड्या बोलांनी उपस्थित मान्यवरांसह तमाम शिवप्रेमींची मने जिंकली. रायबाने आपल्या भाषणातून शंभूराजांच्या शौर्याचा महिमा गायला, ज्याला संपूर्ण सभागृहाने टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

'पुढची पिढी इतिहासाच्या योग्य संस्कारात घडत आहे,' अशी भावना यावेळी व्यक्त झाली.

प्रमुख पाहुणे म्हणुन जामोदेकर बाबा, सुदर्शन चव्हाणके (सुदर्शन टीव्ही) मराठा रामनारायण, पानिपत, डॉ. सिंकुकुमार सिंह (जॉइंट सेक्रेटरी, ऑल इंडिया युनिव्हर्सिटी असोसिएशन) ॲड. अमोल सूर्यवंशी विधीज्ञ सुप्रीम कोर्ट, या सर्व वक्त्यांनी शंभूराजांच्या बलिदानाचा आणि प्रशासकीय कौशल्याचा गौरव करत येथोचित मार्गदर्शन केले.

डॉ. प्रभाकर जाधव उत्कृष्ट नियोजन केले तर डॉ. अरविंद बोधनकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# वैचारिक दिवाळखोरीकडे चाललेली पिढी समाजासाठी मोठे संकट : मंगल खिवंसरा



छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) - वैचारिक दिवाळखोरीकडे चाललेली आजची पिढी समाजासाठी मोठे संकट ठरत असून चिकित्सा, संवाद आणि सामाजिक जाणिवा जपणारी विचार परंपरा टिकवणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मंगल खिवंसरा यांनी केले. त्या स्थानिक जिजाऊ मंदिर, म्हाडा कॉलनी, बाबा पेट्रोल पंपाजवळ, छत्रपती संभाजीनगर येथे १२ वे रमाई महिला चळवळीचे साहित्य संमेलन, पुणे-२०२६ च्या अध्यक्षपदी प्रा. प्रतिमा परदेशी यांची निवड झाल्याबद्दल आयोजित कार्यक्रमातून बोलत होत्या. यावेळी पिछडा ओबीसी संघटनेचे सुदाम चिंचाणे तसेच आंबेडकरी साहित्यिक भीमराव सरवदे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रा. प्रतिमा परदेशी यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना प्रा. परदेशी यांनी परिवर्तनवादी साहित्याची परंपरा जपण्याचा निर्धार व्यक्त केला. ङ्गमहात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले यांच्या विचारांवर आधारित साहित्य चळवळ समाजाला दिशा देणारी आहे, असे त्या म्हणाल्या. यावेळी सुदाम चिंचाणे यांनी मागासवर्गीय समाजातील प्रश्नांवर भाष्य केले, तर भीमराव सरवदे यांनी आंबेडकरी साहित्य चळवळीचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. यावेळी कांचन गादीकर, डॉ. सुनिता शिंदे, ॲड. वैशाली कडू, ललिता खडसे, जयश्री सरोदे, सविता अभ्यंकर, मंगल मून, तिलोत्तमा झाडे, अनिता दैवतकर, मोनिसा खान प्रास्ताविक प्रा.डॉ. रेखा मेश्राम यांनी केले, सूत्रसंचालन ॲड. वैशाली डोळस, आभार प्रा. भारत शिरसाट यांनी केले. महिला वर्कशॉप मध्ये .... महिलांनी सहभाग नोंदविला. तसेच मराठा सेवा संघ, विद्रोही सांस्कृतिक चळवळ व इतर उपस्थितांकडून प्रतिमा परदेशी यांचा सत्कार करण्यात आला.

**चिकित्सा नाकारणाऱ्या संस्कृतीविरोधात रमाई साहित्य संमेलनाचा एल्गार ; प्रा. प्रतिमा परदेशी**

साहित्य हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. स्त्री, बहुजन, श्रमिक आणि वंचित समाजाच्या वेदना मांडणारे साहित्यच समाजाला नवी दिशा देऊ शकते. परिवर्तनवादी विचारांना रोखण्याचा प्रयत्न होत असतानाच चिकित्सा नाकारणाऱ्या संस्कृतीविरोधात रमाई साहित्य संमेलनाने एल्गार पुकारला आहे.

# मराठवाडा तहानला ! गोदावरीसह सिंदफणा, सरस्वती, बिंदुसरा कोरड्या, विहिरी आटल्या; भविष्यात भीषण जलसंकटाची चाहूल

**एप्रिल** आणि मे महिन्याच्या आग ओकणाऱ्या उन्हाळ्यामुळे गोदावरीसह सर्वच नद्यांचे पात्र कोरडे पडले आहेत. जलस्रोतांनी शरणागती पत्करायला सुरुवात केली आहे. गोदावरी नदीच्या विस्तीर्ण पात्रात पाण्याऐवजी वाळूचे पट्टे दिसत आहेत, तर सिंधफणा नदी, सरस्वती नदी आणि बिंदुसरा नदी या नद्या ही पूर्णपणे कोरड्या पडल्या आहेत. गावागावातील बोअरवेलने तळ गाठला आहे. विहिरी, आड, शेततळी आटू लागली आहेत. पाण्याचा प्रत्येक थेंब आता महत्वाचा वाटू लागला असून पावसाळ्यात काही नक्षत्र कोरडे जाणार आहेत. अलनिनो वादळामुळे पाऊसमान कमी राहणार असल्याने भविष्यात भीषण पाणी संकट कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे.

यंदा पावसाने तारले, जोरदार पावसासह काही वेळा अतीवृष्टीही झाली, पिकांची नासाडी झाली, जलसाठे भरले, मात्र एप्रिलपासूनच तापमानाने चाळीशी पार केली आणि मे महिन्यात उष्णतेने विक्राळ रूप धारण केले. परिणामी नदीपात्रातील पाण्याचे बाष्पीभवन झपाट्याने वाढले. भुजलाची पातळी इतकी खाली गेली की अनेक गावांमध्ये पाचशे ते सहाशे फुट खोल बोअर घेऊनही पाणी लागत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात पाण्यासाठीची धावपळ आता हळूहळू सुरू झाली आहे. काही ठिकाणी पहाटेपासून महिलांच्या हंड्यांच्या रांगा लागत आहेत. गोदाकाठीच्या काही गावांमध्ये दोन ते तीन किलोमीटरवरून पाणी आणावे लागत आहे. जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनत चालला आहे. चिंतेची बाब ही आहे की, आगामी पावसाळा जेमतेम असल्याचा अंदाज हवामान खात्यासह पंचांगाने व्यक्त केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहत आहे.

ही केवळ नैसर्गिक आपत्ती नाही तर वर्षानुवर्षांच्या चुकीच्या जलनियोजनाची किंमत आहे. भूजलाचा अनियंत्रित उपसा, सिमेंटच्या वाढत्या जंगलामुळे घटलेले जलमुरण, नाल्यांचे अतिक्रमण, वृक्षतोड आणि जलसंधारणातील ढिसाळपणा यामुळे मातीत पाणी साठवण्याची क्षमता संपत चालली आहे. हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूपही बदलले आहे. कमी दिवसांत अतिवृष्टी आणि नंतर दीर्घ कोरडा कालावधी यामुळे जलचक्रच विस्कळीत झाले आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, मे महिन्यातच निर्माण झालेली ही अवस्था जून-जुलैपर्यंत अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. यंदा मान्सूनने उशीर केला किंवा पावसाचे प्रमाण कमी राहिले तर अनेक गावांमध्ये टँकरशिवाय पर्याय उरणार नाही. प्रशासनासमोर पिण्याच्या पाण्याचे मोठे आव्हान उभे राहणार असून ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही त्याचा मोठा फटका बस शकतो.

जलसंधारण, वृक्षलागवड, पाणी पुनर्भरण आणि भूजल वापरावर कठोर नियंत्रण या उपाययोजना तातडीने राबवल्या नाहीत, तर पुढील वर्षात 'दुष्काळ' हा प्रत्येक घराच्या दारात उभा दिसेल.

गोदावरी सारखे सिंधफणा, कुंडलिकेला बॅरेजेस हवे, गोदावरी नदीवर नाशिकपासून नांदेडच्या विष्णुपुरी पर्यंत ठराविक अंतरावर पाणी साठवण्यासाठी निर्माण केलेले बॅरेजेस निर्णायक ठरले आहेत. शेकडो गावांना याचा थेट लाभ झाला आहे.

या बॅरेजेसमुळे काही भागात बारा महिने गोदावरी तुडूंब भरलेली पाहण्यास मिळते, पावसाळ्यात बीड जिल्ह्यातील बिंदुसरा, कुंडलिका, मांजरा, वांजरा, वाण, अमृता, सरस्वती, कडी या नद्यांना प्रचंड पूर येतो. पुराचे सर्व पाणी वाहून जाते हे पाणी थांबले पाहिजे, मातीत मुरले पाहिजे त्यासाठी आता या नद्यांवर ही बॅरेजेस आवश्यक आहे. ज्या ठिकाणी बॅरेजेस आहेत त्याच्या लोखंडी दरवाजाची स्थिती खूप वाईट आहे.

# पुण्य फल प्राप्तीसाठी असणारा अधिक मास

**भारताला** सण व उत्सवांची गौरवशाली परंपरा लाभलेली आहे.भारतातील सण व उत्सव हे आनंद व पुण्य कर्माचा ठेवा असतात.भारतातील सण-उत्सव मानवी मनांना आनंद, उत्साह,सुख,समाधान, मन शांती, प्रदान करणारे आहेत.या सणाच्या कार्यक्रमातुनच नागरिकांना नव्या जोम व उत्साहाने जगण्याचा आनंद मिळत असतो. भारतीय सण ऋतु मानानुसार ही येतात,यामुळे व्यक्तीचे निसर्गाशी नाते जुळते.काही महिन्यात पुण्य धर्म पालन करण्यासाठी दान, धर्म, दया, उपवास, व्रत, वैकल्ये पाळली जातात यातूनच मनांना शांती, स्थैर्य लाभते.

भले आजचे युग ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाचे आहे. मात्र या काळात या ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाने शांती मिळेलच असे नाही. मात्र सण, उत्सव या धार्मिक कार्यातून काही काळ मनांना शांती व मनांना स्थिरता व समाधान निश्चित लाभते. या भारतीय सण व उत्सवांमुळे आज समाजात स्थिरता आहे. या सण व उत्सवांचा एक नैतिक व भावनिक पगडा भारतीयांच्या मनांवर आहे. असाच एक दान-धर्म-पुण्य कर्मास प्राधान्य प्रदान करणारा महिना म्हणजे 'अधिक मास' होय असे मानतात की प्रत्येक तिसऱ्या वर्षी हा महिना येत असतो. श्रावण महिना जितका पवित्र व मंगलमय मानतात तेव्हढ्याच प्रमाणात हा 'अधिक मास' पवित्र व मंगलमय मानतात.या महिन्यात दान, धर्म करणे, व्रत पाळणे, पुण्य कर्म करणे हे पुण्य प्राप्ती चे स्रोत मानले जातात. अधिक मासाला अनेक नावे आहेत. या महिन्याला पुरुषोत्तम मास, अधिमास तसेच धोंड्याचा महिना असेही संबोधतात. या महिन्यात उपवास करणे, एकवेळच जेवण करणे, मौन भोजन करण्याचे व्रत पाळतात.काही व्रत वैकल्ये करून,दान,धर्म करून पुण्य प्राप्ती होते असे मानतात.अधिक मास तेहतीस महिन्यांनी म्हणजे तीन वर्षांनी येतो म्हणून तेहतीस अनारशाचे दान करणे पुण्य समजल्या जाते. गोर-गरिबांना दान, धर्म करणे, ब्राम्हणांना दान धर्म करणे शुभ मानल्या जाते. अधिक मास दान धर्म करण्याच्या मानवी धर्माची आठवण करून देतो.दान हे गरजू व निकड असलेल्याना द्यावे म्हणजे ते पुण्य लाभते असे मानतात.जावई बापूना सासरी गोड -धोड जेवण व त्यांना कपडे व ईतर वस्तू देऊन त्यांचा मान सन्मान केला जातो.अधिक मासात हिंदू संस्कृती प्रमाणे गोर गरिबांना दान करणे या महिन्यात सत्य बोलणे, कुणाविषयी मनात कलुषित भाव व भावना न ठेवणे, सत्कर्म करणे, उपवास करणे, शुभ संकल्प करणे, पुण्य कर्म करणे, चुका झाल्या असल्यास परमेश्वरला क्षमा याचना करणे, उपवास करून मन शुद्ध, निकोप, व निर्मळ ठेवणे इत्यादी संकल्प केल्या जातात. अधिक महिना म्हणजे मानवी जीवनात पुण्य फल प्राप्तीसाठी येणार हा महिना असल्याने सर्वांनीच या महिन्यात पुण्य कर्म करावे अशी अपेक्षा आहे.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# धार येथील 'भोजशाळा' हे हिंदू मंदिरच; मंदिरमुक्तीच्या लढ्याला आणखी एक ऐतिहासिक यश !

मध्यप्रदेशातील धार येथील ऐतिहासिक 'भोजशाळा' हिंदूंचेच पवित्र श्री वाग्देवी (श्री सरस्वती) मंदिर आहे, यावर इंदूर उच्च न्यायालयाने कायद्याची आणि पुराव्यांची मोहर उमटवली आहे. हा निकाल म्हणजे केवळ एका वास्तूचा विजय नसून शतकानुशतके दडपल्या गेलेल्या ऐतिहासिक सत्याचा आणि परकीय इस्लामी आक्रमकांनी अतिक्रमित केलेल्या मंदिरांच्या मुक्ती लढ्याचा भव्य विजय आहे. भोजशाळेच्या मुक्तीचा लढा आज यशस्वी झाला असला, तरी या संघर्षात मोठा सहभाग हा ङ्गभोजशाळा मुक्ती आंदोलनाचेङ्ग प्रमुख श्री. नवलकिशोर शर्मा आणि हिंदु जनजागृती समिती यांचा होता. समिती या ऐतिहासिक निर्णयाचे सहर्ष स्वागत करते आणि '... अब काशी-मथुरा बाकी हैं!' ची संकल्प घोषणा करत आहे.

**...अब काशी-मथुरा बाकी है ! - हिंदु जनजागृती समिती**

**हिंदु जनजागृती समितिचे आंदोलन आणि हिंदु अधिवेशनाची फलश्रुती !**

धार येथील भोजशाळेच्या मुक्तीसाठी हिंदु जनजागृती समितीने केवळ रस्त्यावर आंदोलने केली नाहीत, तर राष्ट्रीय स्तरावर व्यापक जनजागृती केली. गोवा येथे होणाऱ्या 'वैश्विक हिंदु राष्ट्र महोत्सव' (अखिल भारतीय हिंदु राष्ट्र अधिवेशन) या राष्ट्रीय व्यासपीठावरून दरवर्षी या संदर्भात कायदेशीर आणि धोरणात्मक ठराव मंजूर करून लढ्याची दिशा ठरवली. देशभरातील हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी मध्यप्रदेश सरकार आणि केंद्र सरकारकडे याविषयी सातत्याने दाद मागितली होती. आज न्यायालयाने दिलेल्या या ऐतिहासिक निर्णयामुळे कोट्यवधी हिंदूंच्या भावनांना आणि समितीच्या प्रदीर्घ आंदोलनाला न्याय मिळाला आहे.

**आक्रमकांचे अतिक्रमण हटवून काशी-मथुरेचा लढा निरंतर राहणार !**

या प्रसंगी समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी स्पष्ट केले की, भारतातील हिंदूंची केवळ एक-दोन देवस्थाने आक्रमित झालेली नाहीत.

परकीय आक्रमकांनी आणि धार्मिक कट्टरतावाद्यांनी हिंदूंच्या सहिष्णुतेचा फायदा घेऊन हजारो मंदिरांवर अनधिकृतपणे अतिक्रमणे केली आणि त्यावर स्वतःचा खोटा अधिकार सांगितला. अयोध्या आणि धार (भोजशाळा) येथील निकालांनी हे सिद्ध केले आहे की, असत्याचा बुरखा फार काळ टिकत नाही. आता वेळ आली आहे की काशीच्या ज्ञानवापीपासून ते मथुरेच्या श्रीकृष्ण जन्मभूमीपर्यंतची सर्व आक्रमित क्षेत्रे मुक्त झाली पाहिजेत.'

# गरीब लोक प्रमाणिकपणे कर्ज फेडतात, श्रीमंत माणसं पैसे बुडवतात; नितीन गडकरी यांचे विधान

नवी दिल्ली, दि. १८ (वृत्तसंस्था) - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सहकारी बँकांच्या भूमिकेचे कौतुक करताना गरीब आणि सामान्य नागरिकांना कर्ज मिळवताना येणाऱ्या अडचणींवर भाष्य केले. मोठे लोक कर्जबुडवे ठरत असताना गरीब माणूस नियमितपणे पैसे भरतो, असे त्यांनी म्हटले. एका कार्यक्रमात बोलताना नितीन गडकरी म्हणाले की, 'गरीब माणूस नियमितपणे पैसे भरतो, पण श्रीमंत लोक कर्ज बुडवून डि फॉल्टमध्ये जातात. दुर्दैवाने हे रेकॉर्डमध्येही हे सिद्ध होते.'

ते पुढे म्हणाले की, 'पैसा आधी धनवान लोकांनाच सहज मिळतो, पण गरीब माणसाला कर्ज देताना खूप अडथळे निर्माण होतात.' सहकारी बँकांनी समाजातील छोट्या आणि सामान्य लोकांचे जीवन बदलण्यात मोठी भूमिका बजावल्याचेही गडकरी यांनी नमूद केले. 'अशा छोट्या लोकांचे आयुष्य बदलण्याचे कम सहकारी बँकांनी केले आहे,' असे ते म्हणाले.

# शनि अमावस्येनिमित्त पैठण येथे महामस्तक अभिषेक महोत्सव उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) - श्री शनिग्रह अरिष्ट निवारक मुनिसुव्रतनाथ भगवान अतिशय क्षेत्र, पैठण येथे शनिअमावास्येनिमित्त आयोजित भव्य महामस्तक अभिषेक महोत्सव अत्यंत भक्तिमय वातावरणात व मोठ्या उत्साहात संपन्न झाला. भारतातील जैन धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या मूलनायक भगवान मुनिसुव्रतनाथ यांच्या महामस्तक अभिषेकासाठी राज्यासह देशभरातून हजारो भाविकांनी उपस्थिती लावली होती.

संपूर्ण कार्यक्रम बुंदेलखंड केसरी आचार्य श्री १०८ सिद्धांतसागरजी महाराज व प्रशांतमूर्ती आचार्य श्री १०८ गुनभद्रनंदीजी महाराज ससंघ यांच्या पावन सान्निध्यात तसेच अंतर्मना आचार्य श्री १०८ प्रसन्नसागरजी महाराज यांच्या मंगल आशीर्वादाने पार पडला. सकाळी भगवान मुनिसुव्रतनाथ विधान, धर्मध्वजारोहण व महामस्तक अभिषेक विधी मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला. जयघोष, मंत्रोच्चार आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण तीर्थक्षेत्र मंगलमय झाले होते. यावेळी सौधर्म इंद्र इंद्राणी होण्याचा मान प्रतिभा दिपक स्वयंम प्रियंका सौरभ रतिजित ओमांश विवान अजमेरा परिवार यांना मिळाला. तर शांतीधारेचा मान देवेंद्र दिपेश जैन दिल्ली यांना मिळाला तर जल अभिषेकाचे सौभाग्य रफ्पीन आयुष जैन उत्तराखंड यांना मिळाला. तसेच जयेश काला सी.ए.मुंबई यांना अभिषेकाचा मान मिळाला तर नारळ रसाचे सौभाग्य संदिप शितल धनशेटटी इंटी कर्नाटक यांना मिळाला तर इक्शुरसाचे सौभाग्य सचिन किशन जैन मुंबई यांना मिळाला. तर आम्ररस निलम किर्ती अजमेरा परिवार यांना मिळाला. मोसंबी रस श्रेयांस विजयकुमार जैन मुंबई यांना मिळाला. ध्रुत अभिषेक देवांश भौतिक अभिषेक सागर शाह यांना मिळाला. दुग्ध अभिषेक रजत महेंद्र ठोले यांना मिळाला. दहि अभिषेक सुमित किशोर गंगवाल यांना मिळाला. सर्व औषधी विजय वर्धमान सावळे पुणे यांना मिळाला. प्रथम कळस निधी शाह सोलापुर यांना मिळाला. दुसरा कळस सुनिल पन्नालाल गोधा, तिसरा कळस धरमचंद जैन चतुर्थ कळस नरेश डोसी सुरत यांना मिळाला. चंदनलेपन राजेश पाटणी हैद्राबाद यांना मिळाला, पुष्पवृष्टी मनोज चौधरी हैद्राबाद यांना मिळाला तर मंगल आरती राकेश जैन हैद्राबाद यांना मिळाला तर पुर्ण कळस देवेंद्र दिपेश जैन चंद्रशेखर कासलीवाल यांना मिळाला. यावेळी कार्यकमाचे सुत्रसंचालन श्रेत्राचे महामंत्री विलास पहाडे यांनी केले.



यानंतर आयोजित धर्मसभेत आचार्य श्री १०८ सिद्धांतसागरजी महाराज यांनी आपल्या प्रवचनात सांगितले की, 'मनुष्य जीवन हे धर्म, संयम आणि साधनेसाठी मिळालेले अमूल्य वरदान आहे. आजचा माणूस बाह्य सुखाच्या मागे धावत असताना आत्मशांतीपासून दूर जात आहे. भगवान मुनिसुव्रतनाथांच्या जीवनातून संयम, क्षमा आणि त्याग यांचा आदर्श घ्यावा. ग्रहदोषापेक्षा कर्मदोष मोठा असतो आणि चांगल्या कर्मांनीच जीवन मंगलमय होते.'

प्रशांतमूर्ती आचार्य श्री १०८ गुनभद्रनंदीजी महाराज यांनी आपल्या प्रवचनात सांगितले की, 'महामस्तक अभिषेक म्हणजे केवळ भगवानांवर जलाभिषेक नव्हे, तर आपल्या अंत:करणातील राग-द्वेष धुऊन टाकण्याची साधना आहे. धर्म, अहिंसा आणि सदाचार यांच्या मार्गावर चालल्यास जीवनात खरे सुख प्राप्त होते. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून देवेंद्र स्नेहदेवी सूरजमल दिल्ली, अमित बडजाते, निलम अजमेरा, रतनलाल पहाडिया, विनय सुरथेधाने, अशोक जैन व मनोज चौधरी उपस्थित होते.

महोत्सवानिमित्त हजारो भाविकांसाठी प्रतिभा, स्वयं, प्रियंका, सौरभ, इति, जीत, ओमाश, विवान सिद्धीत अजमेरा परिवार, धाराशिव यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रभावी मंच संचालन बोलीसम्राट प्रविण लोहाडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष महावीर बडजाते, महामंत्री विलास पहाडे, कोषाध्यक्ष विजय पापडीवाल, विश्वस्त जयकुमार बाकलीवाल, प्रमोद कासलीवाल, मनोज काला, प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमीत गंगवाल, डॉ. संजय गंगवाल, डॉ. राजेंद्र काला, स्वदेश पांडे, अभिजीत काला यांच्यासह विश्वस्त मंडळाने परिश्रम घेतले. अशी माहिती प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली. या महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर, हैदराबाद, मुंबई, पुणे, नाशिक, जयपूर, राजस्थान, दिल्ली आदी ठिकाणांहून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते, अशी माहिती प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार सुविधांसह कालमर्यादेत पूर्ण करावीत-मुख्यमंत्री

## महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रे, गडकिल्ले आणि ऐतिहासिक स्थळांच्या विकासासाठी ९९३ कोटींच्या कामांना मान्यता

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- राज्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांच्या जतन व संवर्धनास शासनाचे प्राधान्य असून तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमल बजावणी करावी. तसेच भाविक-पर्यटकांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधासह आरोग्यसुविधाची उपल ब्धता करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्र विकासासाठी एकूण ९९३.७२ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यांना आणि निधीला मंजुरी देण्यात आली. सह्याद्री अतिथीगृह येथे विविध तिर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार,वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकासाठी १७२ कोटींची तरतुद**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग क्षेत्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी कामे करावीत. या विकास आराखड्याअंतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. या कामांसाठी जागांचे भूसंपादन वेळेत करावे. या प्रकल्पासाठी सुमारे १७२.२२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे मे २०२७ पर्यंत काम पूर्ण करावे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत. सध्या २.७ मीटर रुंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, नवीन पोलीस स्टेशन आणि विश्रामगृह, भविष्यातील विकास आराखड्यांतर्गत डिंभे धरण परिसरात सबस्टेशन उभारणे, केबल कार (रोपवे) सुविधा सुरू करणे, एमटीडीसीच्या भीमाशंकर रिसॉर्टचा विकास करणे, राजापूर येथे नव्या पर्यटन सुविधांची निर्मिती करण्याचे नियोजन काटेकोरपणे करावे. आमदार बाबाजी काळे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखड्यात सूचना केलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या.

संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी सर्वंकष आराखडा ४१.७१ कोटींचा आहे. या आराखड्यात संत तुकाराम महाराज जन्मस्थान मंदिर, वैकुंठगमन स्थळ, भंडारा डोंगर आणि परिसरातील इतर धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करावे. यामध्ये रस्त्यांचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, पार्किंग व्यवस्था, भाविकांसाठी निवास सुविधा तसेच माहिती केंद्र उभारणे, भंडारा डोंगर परिसरात हरित क्षेत्र संवर्धन, वृक्षारोपण आणि नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. आमदार सुनिल शेळके यांनी संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धन आराखड्यात सूचविलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी



१३४.८० कोटी रूपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग व लँडस्केपिंग,राज सदरेचे पुनरुज्जीवन, बुरूजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे,अत्याधुनिक लटकता पूल,स्वच्छता व विश्रांती गृहांची कामे, तज्ज्ञांचे मार्गदर्शनाखाली नियोजित कामे वेळेत पार पाडावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी १३३ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळांचा जीर्णोद्धार आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे. याशिवाय, ऐतिहासिक संगमेश्वर मंदिर व घाटाचे संवर्धन, नवीन हँगिंग ब्रिज (झुलता पूल), व्ह्यूइंग गॅलरी आणि सुसज्ज पाथवेची निर्मिती करून या परिसराला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनविण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथील प्रसिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या विकासासाठी सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत आता २१०.४५ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आली असून, यामध्ये ५३.८२ कोटींच्या वाढीव निधीची मागणी समाविष्ट आहे. सध्या या ठिकाणी भाविकांसाठी अत्याधुनिक भक्त निवास, दर्शन बारी (प्रतीक्षागृह), शॉपिंग कॉम्प्लेक्स, फंक्शन हॉल, घाट आणि १.६ किमीचा बाह्य वळण रस्ता (बायपास रोड) यांसारखी कामे गतीने करावीत, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

'श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर' परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण करावीत. पहिला टप्पा (मुख्य मंदिर परिसर) विकासामध्ये भव्य प्रवेशद्वारे, डिजिटल रांग व्यवस्था, प्रतीक्षागृहे, अन्नछत्र, योग-ध्यान केंद्र आणि मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण,दुसरा टप्पा (तीर्थ व पुरातन स्थळे): हरिहर व मार्कंडेय तीर्थांचे वैज्ञानिक पुनरुज्जीवन, घाट, सायकल ट्रॅक, दिव्यांगसुलभ सुविधा, फूड कोर्ट आणि सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था उभारणे. तिसरा टप्पा (मेरू पर्वत विकास) मेरू पर्वतावर भव्य शिवमूर्ती, शिवपुराण व वैदिक संग्रहालय, ॲम्फीथिएटर, लेझर लईट अँड साऊंड शो आणि ध्यानस्थळे विकसित करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पुण्याचे जितेंद्र डुडी जिल्हाधिकारी यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखडा व संत तुकाराम महाराज जन्मस्थान संवर्धन विकास आराखड्याचे सादरीकरण केले.

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिलिंग विकास आराखडा व श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर विकास आराखड्याचे सादरीकरण केले. किल्ले अजिंक्यतारा जतन आणि संवर्धन व संगम माहुली (सातारा) समाधी स्थळ संवर्धन आराखडाचे सादरीकरण साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सादर केले.

# कांदा प्रश्नावर ठाकरे गटाचे समृध्दी महामार्गावर चक्काजाम आंदोलन




छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत असताना त्यांच्या विविध मागण्यांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर मोठे चक्काजाम आंदोलन करत शिवसैनिकांनी सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. शिवसेना नेते आणि विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. समृद्धी महामार्गावरील इंटरचेंज क्रमांक १९, जांबरगाव येथे हजारो शिवसैनिकांनी एकत्र येत सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

विशेष म्हणजे, समृद्धी महामार्ग रोखून आंदोलन करण्याची ही पहिलच वेळ असल्याची चर्चा आंदोलनस्थळी होती. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळत नसल्याने त्यांची अवस्था बिकट झाली आहे. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारात कांद्याला अत्यंत कमी भाव मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेने थेट रस्त्यावर उतरून सरकारला इशारा दिला.

आंदोलनादरम्यान मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. काही काळ वाहतुकीवर परिणाम झाल्याने महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.


**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा सूचना

निम्नस्वाक्षरीकारांकडून पुढील कामासाठी अनुभवी व नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई निविदा मागवण्यात येत आहे. औरंगाबाद ग्रामीण विभाग-२ अंतर्गत असलेले गाळणी शाखा चिकलठाणा ते वेगवेगळ्या औरंगाबाद ग्रामीण विभाग-२ अंतर्गत येणारे सर्व कार्यालय व उपकेंद्र येथे सर्व प्रकारची सामुग्री(मीटर/केबल/सर्व प्रकारचे लाईन मटेरीअल) ने-आन व चढ-उतार, करणे या कामाकरिता निविदा क्र **EE/RDN-II/TS/T-04/2026-27** या नावाने निविदा मागविण्यात येत आहे. विक्री कालावधी दि. १९.०५.२०२६ ते २५.०५.२०२६. निविदा भरण्याची शेवटची तारीख दि २५.०५.२०२६ रोजी १३.०० वाजेपर्यंत. तांत्रिक निविदा उघडण्याची तारीख दि .२५.०५.२०२६ रोजी १४.०० वाजता. वरील निविदा कंपनीच्या **https://etender.mahadiscom.in/** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पीआरओ क्र.३८

कार्यकारी अभियंता,
ग्रामीण विभाग-२, छत्रपती संभाजीनगर


# महापौर इ-स्कूटरवर, सभापती इ-कारने तर आयुक्त सायकलवर मनपात दाखल

## पंतप्रधानांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला मनपा प्रशासनाचा प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी आज सोमवार, दि. १८ मे रोजी शासकीय डिझेल वाहनांचा वापर टाळत पर्यावरणपूरक वाहतुकीचा अवलंब केला.

याअंतर्गत महापौर समीर राजूरकर हे इ-स्कूटरवरून महापालिका मुख्यालयात दाखल झाले, तर स्थायी समिती सभापती श्री अनिल मकरिये हे इ-कारने मनपात पोहोचले. मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी स्वतः सायकलवरून कार्यालयात येत इंधन बचत आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

आयुक्त अमोल येडगे यांनी यापूर्वीच आदेश जारी करून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सोमवार, दि. १८ मे रोजी सायकल अथवा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करून कार्यालयात येण्याच्या सूचना दिल्या होत्या. कोणत्याही अधिकाऱ्याने शासकीय वाहनाचा वापर करू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते.

तसेच ज्या अधिकाऱ्यांना फिल्ड व्हिजिट करणे आवश्यक आहे, त्यांच्यासाठी आयुक्तांच्या पूर्वपरवानगीनंतर इ-कारची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले होते.

या आदेशाचे पालन करत अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील हे



त्यांच्या अंगरक्षकासह दुचाकीवरून कार्यालयात आले. याशिवाय विविध विभागप्रमुखांनीही शासकीय वाहनांचा वापर टाळत स्वतःची वाहने, सायकल तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करून महापालिका मुख्यालयात हजेरी लावली. या उपक्रमामुळे इंधन बचतीसह पर्यावरण संरक्षणाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला.

# औषध विक्रेत्यांचा दि.२० रोजी नियोजीत बंद; अत्यावश्यक औषधे खरेदी करुन ठेवण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेने बुधवार दि.२० रोजी बंद पुकारला आहे. ज्या रुग्णांना नियमित औषधांची आवश्यकता असते त्यांनी आपली गैरसोय टाळण्यासाठी आपली आवश्यक औषधे आगाऊ खरेदी करुन ठेवावी. बंद कालावधीत औषधे उपलब्ध न झाल्यास रुग्णांनी सहायक आयुक्त शा. ना. साळे (८९८३२९०१६२), वि. वि. नांगरे (७३८७५६१३४३) व औषध निरीक्षक म. भा. पैठणे (९०२१८९९०१८) यांना भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा,असे आवाहन छत्रपती संभाजीनगर परीमंडळ -२ चे सहा.आयुक्त (औषधे) वि.वि. नांगरे यांनी केले आहे.


**Truhome FINANCE**

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

**मागणी सूचना**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार यांनी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात** ) कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** चे असे म्हणणे आहे की , हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत . म्हणून ह्या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम -२००२ (सरफेसी कायदा)अन्वये आणि कलम-१३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्यावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सुचने व्यतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.

कलम १३(२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार , सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रकमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु. |
|---|---|---|
| **कर्ज खाते क्रमांक: SHLHAURD0001189, TTUHAURD0001627**<br>**१. श्री. सचिन विरेश तम्मल (कर्जदार)**<br>**२. सौ. मीनाक्षी सचिन तम्मल (सह-कर्जदार)**<br>**सध्याचा पत्ता :- घर नं. २-१६-५०, माटे निवास, फकीरवाडी, औरंगाबाद, मरोटी मंदिर जवळ, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत - ४३१००१. तसेच पत्ता :- दुकान नं. १२, जेठिया टॉवर, गुलमंडी, औरंगाबाद बुक डेपो शेजारी, औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३१००१. तसेच पत्ता :- सी.टी.एस. नं. १५८४३/भाग, शीट नं. २८३/ए, सर्व्हे नं. १३ वर असलेल्या गुठेवारी प्लॉट नं. ३० वर बांधलेले घर, ज्याचे प्लॉट क्षेत्रफळ ८१०.०० चौ. फूट व बांधकाम क्षेत्रफळ १४००.०० चौ. फूट आहे, मौजे शहानूरवाडी, ता. व जि. छत्रपती संभाजीनगर - ४३१००१**<br>**कर्जाची रक्कम – रु. ६३,२६,४९०/-**<br>**कर्ज खाते क्रमांक: SHLHAURD0001189,**<br>**कर्जाची रक्कम – रु. ८,४६,५९२/-**<br>**कर्ज खाते क्रमांक: TTUHAURD0001627**<br>**एनपीए तारीख – ०६/०५/२०२६** | मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग, म्हणजे सी.टी.एस. नं. १५८४३/भाग, शीट नं. २८३/ए, सर्व्हे नं. १३ वर असलेल्या गुठेवारी प्लॉट नं. ३० वर बांधलेले घर, ज्याचे प्लॉट क्षेत्रफळ ८१०.०० चौ. फूट व बांधकाम क्षेत्रफळ १४००.०० चौ. फूट आहे, मौजे शहानूरवाडी, ता. व जि. छत्रपती संभाजीनगर येथे स्थित असून, त्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत :- पूर्वेस :- ०३.०० फूट गली, पश्चिमेस :- ५०.०० फूट रस्ता,दक्षिणेस :- प्लॉट नं. २९,उत्तरेस :- प्लॉट नं. ३१ | मागणी सूचना तारीख: १३-०५-२०२६<br>मागणी नोटीस रक्कम: दिनांक ११-०५-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. SHLHAURD0001189 अंतर्गत रु. ६५,६१,२३३/- (फक्त पासष्ट लाख एकसष्ठ हजार दोनशे तेहतीस रुपये) आणि कर्ज खाते क्र. TTUHAURD0001627 अंतर्गत रु. ९,२६,९९१/- (फक्त नऊ लाख सव्वीस हजार नऊशे एक्याण्णव रुपये) तसेच आतापर्यंत नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज व आनुषंगिक खर्च, खर्च इ. |
| **कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता** | **प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता** | **मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु.** |
| **कर्ज खाते क्रमांक.- SLPHAURD0001204**<br>**१. श्री. मयूर आसराम धनुरे (कर्जदार)**<br>**२. सौ. सुनीता आसराम धनुरे (सह-कर्जदार)**<br>**३. मेसर्स मयूर ट्रेडिंग कंपनी (सह-कर्जदार)**<br>**४. कु. नूतन आसराम कोकरे (सह-कर्जदार)**<br>**सध्याचा पत्ता :- घर नं. १०४, बीड बायपास रोड, देवळाई चौक, नाईक नगर, समृद्धी फार्मा समोर, औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३१००१ तसेच पत्ता :-शोभानंद सहकारी संस्था, प्लॉट नं. २, गट नं. १०३ पी, गृह निर्माण संस्था, माऊली नगर, देवळाई, औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३१००१. तसेच पत्ता :-प्लॉट नं. १०४, गट नं. १०० पी, नाईक नगर, देवळाई, माऊली हॉस्पिटल जवळ, औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३१००१.**<br>**कर्जाची रक्कम – रु. ५४,६१,६५४/-**<br>**एनपीए तारीख – ०६/०५/२०२६** | मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग, म्हणजे गट नं. १०४/ भाग मधील प्लॉट नं. १०४, क्षेत्रफळ १५८.१ चौ. मीटर, मौजे देवळाई, ता. व जि. औरंगाबाद येथे स्थित असून, त्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत :-पूर्वेस :- ९ मीटर रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट नं. १०३,दक्षिणेस :- प्लॉट नं. ११९,उत्तरेस :- ९ मीटर रस्ता | मागणी सूचना तारीख: १५-०५-२०२६<br>मागणी नोटीस रक्कम: दिनांक ११-०५-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. SLPHAURD0001204 अंतर्गत रु. ५४,६१,६५४/- (फक्त चौपन्न लाख एकसष्ठ हजार सहाशे चौपन्न रुपये) तसेच आतापर्यंत नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज व आनुषंगिक खर्च, खर्च इ. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते कि, हि नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम -१३ (१३) नुसार सादर वर्णित मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री , भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

ठिकाण - औरंगाबाद
दिनांक - १५/०५/२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )



## नगर परिषद वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर

फोन नंबर (०२४३६-२२२०३६, फॅक्स नंबर (०२४३६-२२५२५६)
**Email :** npvaijapur@gmail.com

जा.क्र.नपवै/कावि/पापुस्ववि/२०२६/ दिनांक :-१८/०५/२०२६

**निविदा सुचना**

वैजापूर नगर परिषद न.प.फंड व इतर शासकीय निधी अंतर्गत खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी रजिष्टर्ड गुत्तेदाराकडून/ एजन्सी धारकाकडून निविदा मागवित आहे. कोरे निविदा प्रपत्र सुटीचे दिवस वगळून दि. २७-०५-२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यन्त खालील प्रमाणे निश्चित किंमत लेखा विभागात जमा केल्यानंतर नगर परिषद कार्यालयात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागात मिळतील.

गुत्तेदाराने मोहोरबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीत (तांत्रिक लिफाफा मध्ये सर्व पात्रते विषयक सर्व कागदपत्र तसेच निविदा प्रपत्र किंमत व इसारा रक्कम भरले बाबतची पावती सादर करावे. आर्थिक लिफाफामध्ये स्वाक्षरीत दर भरलेले निविदा प्रपत्र सादर करावे) नगर परिषद वैजापूर कार्यालयामध्ये दिनांक २७-०५-२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यन्त सादर कराव्यात.

१) जमा केलेल्या निविदा प्रपत्र व इसारा रकमेची पावती क्रमांक सिलबंद तांत्रिक व आर्थिक लिफाफावर नमुद करावा, वरील रक्कम भरणा केल्या शिवाय निविदा स्विकारली जाणार नाही. २) इतर अटी व शर्ती तसेच अंदाजपत्रकाची प्रत निविदा प्रपत्रासोबत देण्यात येईल. ३) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न.प.ने राखुन ठेवला आहे.

**कामाचा तपशिल खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम | निविदा प्रपत्र रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैजापूर शहर पाणीपुरवठा वितरण जाळयासाठी वॉल चेंबर बांधणे. | ४,९९,९०४ | ५००० | ५०० | १ महिना |

स्वाक्षरीत/ -
ए.एम. सोनवणे
अभियंता, पाणी पुरवठा
नगर परिषद वैजापूर

स्वाक्षरीत/ -
बि. यु.बिघोत (राजपूत)
मुख्याधिकारी
नगर परिषद वैजापूर

स्वाक्षरीत/ -
डॉ. दिनेश पी. परदेशी
नगराध्यक्ष
नगर परिषद वैजापूर



## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

सर्वसाधारण सभा

### कार्यक्रम पत्रिका क्रमांक (०६)

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' चे प्रकरण- २ मधील नियम क्र.१ (ह) आणि (आय) अन्वये**

दिनांक:-१२.०५.२०२६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' चे प्रकरण-२ मधील नियम क्र.१ (क) अन्वये मा.महापौर श्री.समीर सुभाष राजूरकर यांनी बुधवार दिनांक २०.०५.२०२६ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०६) रोजी सकाळी ११.०० वाजता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेतील प्रशासकीय इमारतीतील 'प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह' येथे आयोजित केली आहे. प्रायोजित सभेते निम्नलिखित विषय निर्णयार्थ आहेत.

**इतिवृत्तांत कायम करणे.**

**विषय क्रमांक ४८:-**
दि.१०.०२.२०२६ (का.प.क्र.०१) दि.०५.०३.२०२६ (का.प.क्र.०२) व दि.२७.०३.२०२६ (का.प.क्र.०३) सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**स.पालिका सदस्यांकडून आलेले प्रस्ताव**

**विषय क्रमांक ४९:-**
सातारा परिसरातील एस.आर.पी.एफ. रोड वरील पेशवे नगर चौकाला 'देशभक्त चाफेकर बंधु चौक' असे नाव देणे.
सूचक:- श्रीमती सविता रत्नाकर कुलकर्णी अनुमोदक:- श्री.राजपुत पद्मसिंग काशीनाथ

**विषय क्रमांक ५०:-**
पेशवे नगर, एस.आर.पी.एफ. रोड सातारा परिसर येथील चौकाला 'तुकामाई चौक' असे नाव देणे.
सूचक:- श्रीमती सविता रत्नाकर कुलकर्णी अनुमोदक:- श्री.राजपुत पद्मसिंग काशीनाथ

**विषय क्रमांक ५१:-**
सातारा परिसर येथील बॅम्बो हॉस्पीटल ते धुळे सोलापूर कडे जाणाऱ्या मार्गास 'धर्मवीर आनंद दिघे मार्ग' व जेथ्वाल यांच्या घरासमोरील चौकास 'धर्मवीर आनंद दिघे चौक' असे नाव देणे.
सूचक:- श्री.सिध्दांत संजय शिरसाट अनुमोदक:- श्रीमती श्वेता सुमित त्रिवेदी

**विषय क्रमांक ५२:-**
सातारा परिसर येथील राधा मंगल कार्यालया समोरील चौकास 'राजे यशवंतराव होळकर चौक' असे नाव देणे.
सूचक:- श्री.सिध्दांत संजय शिरसाट अनुमोदक:- श्रीमती श्वेता सुमित त्रिवेदी

**विषय क्रमांक ५३:-**
औद्योगिक केंद्र भागातील कामगार रहिवाशियांना मनपाकडून पी.आर.कार्ड देण्याकरीता महाराष्ट्र राज्य सरकार यांना प्रस्ताव पाठविणे.
सूचक:- श्री.बालाजी दिनकर मुंडे, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड अनुमोदक:- श्रीमती सत्यभामा दामूअण्णा शिंदे, श्रीमती सुरेखा ताराचंद गायकवाड

**विषय क्रमांक ५४:-**
आमखास मैदान ते आरेफ कॉलनी या मुख्य रस्त्यावर सुयोग्य ठिकाणी आकर्षक प्रवेशद्वार उभारणे.
सूचक:- श्रीमती फरजाना शेख गुलाम रसूल अनुमोदक:- श्री.अब्दुल समीर साजीद

**विषय क्रमांक ५५:-**
भीमनगर येथील २२ गुंठे जमीनीवर नागरीकांच्या सुविधेसाठी सुसज्ज दोन मजली दवाखाना बांधणे.
सूचक:- श्री.अफसर खान यासीन खान अनुमोदक :- श्री.अमित सुधाकर भुईगळ

**विषय क्रमांक ५६:-**
संजय नगर ते बायजीपुरा या रस्त्यास 'डॉ.जफर अहमद खान मार्ग' असे नाव देणे.
सूचक:- श्री.गोविंद परशुराम केंद्र, अनुमोदक :- श्री.किशोर बाबुराव नागरे, श्री.खान फेरोज मोइनउद्दीन खान, श्री.अब्दुल समीर साजीद

**विषय क्रमांक ५७:-**
मिटमिटा येथील तीसगाव कडे जाणाऱ्या चौकास 'राष्ट्रपुरुष शहिद भगतसिंग चौक' असे नाव देणे.
सूचक:- श्री.गणेश कीतीकराव लोखंडे अनुमोदक:- श्रीमती सावित्रीबाई हिरालाल वाणी

**विषय क्रमांक ५८:-**
प्रभाग क्र.०४ अंतर्गत मौजे मिटमिटा शिवारातील अप्पावाडी परिसरास 'महात्मा बसवेश्वर नगर' असे नाव देणे.
सूचक:- श्री.गणेश कीतीकराव लोखंडे अनुमोदक:- श्रीमती सावित्रीबाई हिरालाल वाणी

विषय क्रमांक ५९:-
मनपाच्या हद्दीतील विजेता खेळाडूंस सत्कार व आर्थिक मदत देण्याची प्रथा सुरु करणे.
सूचक:- श्री.अब्दुल मतीन खान मस्तान खान अनुमोदक:- श्री.शेख साबेर पाशु

**विषय क्रमांक ६०:-**
नगर भुमापन सर्व्हेक्षण योजने अंतर्गत मिळकतधारकांना त्यांच्या मिळकतीची सनद तयार झाल्यानंतर त्यांची किंमत मिळकत धारकांकडून वसुल करुन ते मनपास वर्ग होईल या योजनेवर होणारा खर्च मनपास फंडातून करणे किंवा मनपा निधी उपलब्ध नसल्यास शासनाकडून विशेष बाब म्हणून विशेष निधीची मागणी करणे.
सूचक:- श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक:- श्रीमती छाया विजय वाघोरे

**विषय क्रमांक ६१:-**
गारखेडा अंतर्गत जानकी हॉटेल ते रेणुकानगर कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यास 'डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन मार्ग' व मेहरसिंग नाईक शाळे समोरील चौकास 'कै. संजयसिंग (नाईक) चव्हाण चौक' असे नाव देणे.
सूचक:- श्री.गोविंद परशुराम केंद्रे अनुमोदक:- श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य, श्रीमती दया कैलास गायकवाड, श्रीमती सुनिता संजय सोळुंके

**विषय क्रमांक ६२:-**
शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी परवानाधारक देशी दारुची दुकाने, बीयरबार हे मनपाच्या हद्दी बाहेर स्थलांतरीत करण्याची कार्यवाही प्रशासना तर्फे करणे.
सूचक:- श्री.अब्दुल समीर साजीद अनुमोदक:- श्री.मुन्शी भिकन शेख

**विषय क्रमांक ६३:-**
प्रभाग क्र. २४, हम्मालवाडा अंतर्गत मनपाच्या खुल्या जागेवर सभागृह विकसित करणे.
सूचक:- श्रीमती नसीम बेगम मोहम्मद अफसर अनुमोदक:- श्रीमती नूर जहान इकबाल

**विषय क्रमांक ६४ :-**
खडकेश्वर येथील वाचनालयाच्या ठिकाणी राष्ट्रसंत गाडगे बाबा यांचे स्मारक, पुतळा, वाचनालय, सभागृह आणि अभ्यासिका (लायब्ररी) नवीन बांधकाम करणे.
सूचक:- श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे अनुमोदक:- श्री.अनिल श्रीकिशन भांगले, श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.अशोक धोंडिबा वाघमारे

**विषय क्रमांक ६५:-**
विलायत कवी व सुफी खादरार 'स्वर्गीय श्री.काझी सलीम' यांच्या स्मरणार्थ दरवर्षी अधिकृत स्वरुपात 'एक शाम श्री.काझी सलीम के नाम' मुशायरा व कवी संमेलन आयोजित करणे व आवश्यक आर्थिक तरतुद मनपाच्या वार्षिक अंदाजपत्रकात समाविष्ट करणे.
सूचक:- श्री.मोहम्मद वसीम अलीम अहमद अनुमोदक:- श्री.प्रकाशसाहेब दामोधर काकडे

**विषय क्रमांक ६६:-**
एन-६ संभाजी कॉलनी परिसरातील इ.४थी इंग्लिश स्कूलकडून थकीत भाडे वसुल करुन मनपाच्या ताब्यात घेणे तसेच ही इमारत पाडून या ठिकाणी सी.बी.एस.ई.माध्यमाची शाळा सुरु करणे.
सूचक:- श्रीमती मीना नितीन खरात अनुमोदक:- श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे, श्रीमती माधुरी मिलींद देशमुख (अडवत), श्री.मयुर बन्सीलाल वंजारी

**विषय क्रमांक ६७:-**
प्रभाग क्र. १२, १३ व १४ अल्तमश कॉलनी येथील मनपाच्या खुल्या जागेवर एक सुसज्ज व प्रशस्त मंगल कार्यालयाची उभारणी करणे.
सूचक:- श्री.सय्यद उसामा अब्दुल कदीर, श्री.अब्दुल समीर साजीद अनुमोदक:- श्री.शेरखान हाजी अब्दुल रहेमान खान, श्री.मुन्शी भिकन शेख

**विषय क्रमांक ६८:-**
प्रभाग क्र. ११, एन-४, पी-५, विनायक गृहनिर्माण संस्था येथील उद्यानास 'सिध्दि विनायक उद्यान' असे नाव देणे.
सूचक:- ॲड.माधुरी मिलींद देशमुख-अडवत, श्री.विश्वनाथ गुरुलींग स्वामी
अनुमोदक:- श्रीमती मयुर बन्सीलाल वंजारी, श्रीमती मीना नितीन खरात

**विषय क्रमांक ६९:-**
प्रभाग क्र. २० अंतर्गत इंदिरानगर येथे मनपाच्या मालकीची शाळेची इमारत बांधणे.
सूचक:- श्रीमती अनिता किशोर मानकापे अनुमोदक:- श्री.जालिंदर महादेव शेंडगे

**विषय क्रमांक ७०:-**
नारेगाव, राजेंद्रनगर या भागात मनपाच्या ओपन स्पेस जागेला 'श्री संत सेवालाल महाराज चौक' असे नाव देणे.
सूचक:- श्रीमती मोहिनी लक्ष्मण गायकवाड अनुमोदक:- श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

**विषय क्रमांक ७१:-**
नारेगाव येथे मनपाच्या जागेत आरोग्य केंद्राची इमारत नव्याने उभारणे.
सूचक:- श्रीमती मोहिनी लक्ष्मण गायकवाड अनुमोदक:- श्रीमती भारती महेंद्र सोनवणे

**विषय क्रमांक ७२:-**
सिडको परिसरातील चिस्तीया चौक ते बळीराम पाटील विद्यालय या चारपदरी दुतर्फा रस्त्यास 'धर्मवीर मोरेश्वरजी सावे मार्ग' असे नाव देणे.
सूचक:- श्री.मयुर बन्सीलाल वंजारी
अनुमोदक:- श्री.विश्वनाथ गुरुलींग स्वामी, ॲड.माधुरी मिलींद देशमुख-अडवत, श्रीमती मीना नितीन खरात

**विषय क्रमांक ७३:-**
मनपाच्या मालकीची 'श्री साई नॉलेज शिक्षण संस्था' यांच्याकडून सर्व थकबाकीची वसुली करुन घेणे, इमारत पाडणे व त्या ठिकाणी मनपामार्फत मराठी व इंग्रजी (सी.बी.एस.ई.) माध्यमाची शाळा सुरु करणे.
सूचक:- श्री.मयुर बन्सीलाल वंजारी अनुमोदक:- श्री.विश्वनाथ गुरुलींग स्वामी

**विषय क्रमांक ७४:-**
जळगाव हायवे लगत, आंबेडकर नगर जवळील, पिसादेवीकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सूचक:- श्री.विजय साईनाथ औताडे अनुमोदक:- श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री.रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ७५:-**
जळगाव हायवे लगत हर्सूल टी. पॉईंट कडून मयुरपार्ककडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'श्री. खाटू श्याम बाबा प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सूचक:- श्री.विजय साईनाथ औताडे अनुमोदक:- श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री.रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ७६:-**
जळगाव हायवे लगत उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समितीकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'राजमाता जिजाऊ माँसाहेब प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सूचक:- श्री.विजय साईनाथ औताडे अनुमोदक:- श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री.रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ७७:-**
जळगाव हायवे लगत साई मेडीसिटी हॉस्पीटल जवळील जाधववाडीकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सूचक:- श्री.विजय साईनाथ औताडे अनुमोदक:- श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री.रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ७८:-**
अंबिका नगर, वडाच्या झाडाकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'मा.सरपंच स्व.पै.शंकरराव पाटील औताडे प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सूचक:- श्री.विजय साईनाथ औताडे अनुमोदक:- श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री.रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ७९:-**
जळगाव हायवे लगत जाधववाडी सिग्नल कडून सुरेवाडीकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सूचक:- श्री.विजय साईनाथ औताडे अनुमोदक:- श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री.रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ८०:-**
जळगाव हायवे लगत SBOA चौक येथून मयुरपार्ककडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'हिंदवी स्वराज्य छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सूचक:- श्री.विजय साईनाथ औताडे अनुमोदक:- श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री.रामदास पंडितराव हरणे

**(स्वाक्षरी)**
**नंदकिशोर भोंबे**
**महानगरपालिका सचिव**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका.**